गुरुवार, १७ नोव्हेंबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक १२०
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अभिमानास्पद! जी-२० गटाचे भारताकडे अध्यक्षपद



**बाली :** इंडोनेशियातील बाली येथे आयोजित जी-२० गटाच्या दोन दिवसीय शिखर परिषदेची बुधवारी (दि. १६) सांगता झाली. सदस्य देशांनी संयुक्त जाहीरनाम्याला अंतिम रूप दिल्यानंतर इंडोनेशियाकडून आगामी वर्षासाठी जी-२०चे अध्यक्षपद भारताकडे सुपूर्द करण्यात आले. इंडोनेशियाचे अध्यक्ष जोको विडोडो यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पुढील वर्षाच्या जी-२० परिषदेचे अध्यक्षपद सोपविले. यानंतर पंतप्रधान मोदी म्हणाले की, या गटाचे अध्यक्षपद स्वीकारणे ही भारतातील प्रत्येक नागरिकासाठी अभिमानाची बाब आहे. सर्व देशांच्या पाठिंब्याच्या जोरावर आम्ही जी-२० शिखर परिषद जागतिक कल्याणासाठी आदर्शवत बनवू.


### अंतरंग
'किल्ले रायगड विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार'/२
रायगड जिल्ह्यात सागरी कवच अभियान/५
राष्ट्रीय योंगमुडो स्पर्धेत रायगडची टीम चॅम्पियन/८


# राज्यात बेरोजगारांना नोकरीची संधी

## शिंदे-फडणवीस सरकार देणार एक लाखाहून अधिक रोजगार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार कौशल्य विभागाच्या पुढाकाराने एक लाखाहून अधिक तरुण-तरुणींना रोजगार देणार आहे. या संदर्भात बुधवारी (दि. १६) राजभवन येथे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल्य रोजगारमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.



याबाबत माहिती देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात नवीन सरकार आल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मी असा निर्णय घेतला की आमच्या सरकारचा सर्वाधिक भर रोजगारावर असला पाहिजे. देशातील शासकीय रोजगारावरची अघोषित बंदी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दूर केली. १० लाख रोजगार देण्याचा निर्णय केला. त्या अंतर्गत राज्य सरकारच्या वतीने ७५ हजार बेरोजगारांना नोकऱ्या देण्याचा निर्णय केला. त्याचसोबत खासगी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

### *सामंजस्य करार*

*या वेळी ४४ नामांकित उद्योजक, प्लेसमेंट एजन्सी, कौशल्य विभागाचे आयुक्त यांच्यासमावेत रोजगारासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे राज्यातील एक लाखांहून अधिक बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. यात प्रामुख्याने हॉस्पिटॅलिटी, मीडिया अ‍ॅण्ड एन्टरटेन्मेंट, बांधकाम, रिटेल, बँकिंग, एव्हिएशन या क्षेत्रात दहावी पास-नापास, बारावी, पदवीधर, पदविकाधारक, फार्मसी, आयटीआय, पॉलिटेक्निक, इंजिनिअरींग पदवी या शैक्षणिक पात्रताधारक उमेदवारांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत.*

# पालघर जि.प.मध्ये 'मविआ'चे पतन

## बाळासाहेबांची शिवसेना आणि भाजप युतीची सत्ता

**पालघर : प्रतिनिधी**

पालघर जिल्हा परिषदेत सत्तापरिवर्तन होऊन आता बाळासाहेबांची शिवसेना आणि भाजप यांनी एकत्र येऊन सत्ता स्थापन केली आहे, तर महाविकास आघाडीची सत्ता गेली आहे. बाळासाहेबांची शिवसेना गटाचे प्रकाश निकम अध्यक्षपदी, तर भाजपचे पंकज कोरे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. या निवडणुकीच्या माध्यमातून शिंदे गटाला महाराष्ट्रात पहिला जिल्हा परिषद अध्यक्ष मिळाला आहे.

पालघर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदासाठी बुधवारी (दि. १६) निवडणूक झाली. पालघर जिल्हा परिषद महाविकास आघाडीकडे होती, पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उठावानंतर ठाकरे गटाचे सर्वच्या सर्व २० सदस्य शिंदे गटात दाखल झाले. त्यातच बाळासाहेबांची शिवसेना आणि भाजप एकत्र आल्याने जिल्हा परिषदेत सत्तापरिवर्तन झाले आहे. याकरिता पालघरचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण



आणि बाळासाहेबांची शिवसेनेचे संपर्क प्रमुख आमदार रवींद्र फाटक आवर्जून उपस्थित होते.

५७ सदस्य असलेल्या पालघर जिल्हा परिषदेमध्ये २९ हा बहुमताचा आकडा आहे. शिंदे गटाचे २० आणि भाजपचे १३ असे ३३ सदस्य एकत्र येऊन त्यांनी सत्ता स्थापन केली. बहुमत नसल्याने महाविकास आघाडीकडून एकही अर्ज दाखल करण्यात आला नाही. त्यामुळे निवडणूक बिनविरोध झाली. निवडणुकीनंतर शिंदे गट आणि भाजपच्या समर्थकांनी जल्लोष केला.

# विनायक मेटे मृत्यूप्रकरणी चालकावर गुन्हा दाखल

**खालापूर : प्रतिनिधी**

शिवसंग्राम संघटनेचे प्रमुख माजी आमदार विनायक मेटे यांच्या मृत्यू प्रकरणात सीआयडीने मेटे यांच्या वाहनचालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवला आहे. रसायनी पोलीस ठाण्यात कलम ३०४ (२) नुसार या गुन्ह्याची नोंद झाली आहे.



मराठा आरक्षणासाठी १४ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोलावलेल्या बैठकीसाठी विनायक मेटे बीडहून मुंबईच्या दिशेने येत होते. रविवारी पहाटे ५च्या सुमारास महामार्गावरील माडप बोगद्याजवळ त्यांच्या कारला भीषण अपघात झाला. यात मेटे यांचा मृत्यू झाला होता.

या घटनेचा सीआयडीकडून तपास सुरू होता. तपासात विनायक मेटेंची गाडी ज्या मार्गाने गेली त्या मार्गावरील सीसीटीव्ही तपासण्यात आले. याशिवाय तज्ज्ञांची एक समिती तयार करून त्यांच्याकडूनही मते घेतली गेली. या समितीत आयआरबीचे अभियंता आणि इतरांचा समावेश होता.

सीआयडीने केलेल्या सीसीटीव्ही तपासणीत विनायक मेटेंचा चालक एकनाथ कदमने ताशी १३०-१४० किलोमीटर वेगाने गाडी चालविल्याचे समोर आले आहे. याशिवाय गाडीचा अपघात होण्याआधी चालकाने दुसरी गाडी ओव्हरटेक करीत असतानाही आपली गाडी ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. जागा नसतानाही ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नातच हा अपघात झाला, असेही या तपासात स्पष्ट झाले आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांना ३४ टक्के महागाई भत्ता लागू

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने एसटी कर्मचाऱ्यांना ३४ टक्के महागाई भत्ता जाहीर केला आहे. याबाबतचे पत्र एसटी महामंडळाला पाठविण्यात आले आहे.

एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे ३४ टक्के महागाई भत्ता देण्याचा निर्णय मागील सरकारच्या काळापासून रखडला होता. त्यांना २८ टक्के भत्त्यावर समाधान मानावे लागत होते. नव्या सरकारने याची दखल घेत निर्णय घेतला. यामुळे या कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# पनवेलमध्ये व्यवसाय परवाना धोरणासंदर्भात व्यापाऱ्यांची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेने व्यवसाय परवाना धोरण जाहीर केले आहे. हे धोरण काय आहे याची माहिती महापालिका क्षेत्रातील व्यापाऱ्यांना व्हावी यासाठी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनामध्ये मंगळवारी (दि. १५) बैठक आयोजित करण्यात आली होती.



(छाया : अक्षय शार्दुल)

या बैठकीला भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, एकनाथ गायकवाड, डॉ. अरुणकुमार भगत, नरेश ठाकूर, विकास घरत, मुकीद काझी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, महापालिका उपायुक्त गणेश शेट्टे, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, कळंबोली व्यापारी सेलचे कमल कोठारी, नारायण ठाकूर, नितीन मुनोथ यांच्यासह पदाधिकारी, व्यापारी उपस्थित होते. या वेळी पनवेल महापालिकेच्या नवीन व्यवसाय परवाना धोरणासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच हे धोरण काय आहे याची माहिती व्यापाऱ्यांना देण्यात आली.

## निवडक

### ब्रिटनकडून भारतीयांसाठी दरवर्षी तीन हजार व्हिसा

**लंडन :** इंडोनेशियातील बाली येथे आयोजित जी-२० परिषदेत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्रिटनच्या पंतप्रधानपदी नियुक्त झालेले भारतीय वंशाचे ऋषी सुनक यांची नुकतीच भेट घेतली. या भेटीनंतर दुसऱ्याच दिवशी ब्रिटन सरकारने भारतीयांसाठी दरवर्षी तीन हजार व्हिसा जारी करण्याची घोषणा केली आहे. ब्रिटनमध्ये करिअर करण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी ही मोठी संधी असेल.

### पोलीस भरतीची बनावट अधिसूचना; गुन्हा दाखल

**मुंबई :** महाराष्ट्र पोलीस भरतीचे बनावट नोटिफिकेशन सोशल मीडियात व्हायरल झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याद्वारे भरतीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांना फसविण्याचा कट पोलिसांनी हाणून पाडला आहे.

# श्रद्धाचा मारेकरी आफताबची आता होणार नार्को टेस्ट

## न्यायालयाची परवानगी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वसईतील श्रद्धा वालकर हत्याकांडप्रकरणी पोलिसांनी प्रियकर आफताब अमीन पूनावालाला अटक केल्यानंतर अनेक धक्कादायक बाबी समोर येत आहेत, मात्र आफताब तपासात दिशाभूल करीत असल्याने त्याची नार्को टेस्ट करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी पोलिसांनी दिल्ली सत्र न्यायालयाकडे केली होती. ही मागणी न्यायालयाकडून मान्य करण्यात आली आहे.

दिल्लीतील निर्घृण हत्याकांडामुळे संपूर्ण देशभरात खळबळ उडाली आहे. श्रद्धाचा प्रियकर आफताबने तिचा गळा आवळून खून केल्यानंतर मृतदेहाचे ३५ तुकडे करून विल्हेवाट लावल्याचे उघड झाले. आफताबला अटक केल्यानंतर तो पोलिसांना सहकार्य करीत नसून त्याने अद्यापही श्रद्धाचा मोबाईल आणि तिची हत्या करण्यासाठी वापरलेल्या चाकूसंदर्भात माहिती दिली नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, आफताबच्या नार्को टेस्टचा मार्ग मोकळा झाला आहे. याचा अहवाल न्यायालयात मान्य नसला, तरी आतापर्यंत हाती लागलेल्या पुराव्याची पडताळणी करण्यासाठी पोलिसांना मदत होईल.



**पनवेल : माजी आमदार मनोहर भोईर यांचे कट्टर समर्थक जनार्दन रामचंद्र म्हात्रे यांनी भाजपचे कमळ हाती घेतले आहे. राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण आणि आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्षप्रवेश सोहळा झाला. पक्षप्रवेश केल्यानंतर जनार्दन म्हात्रे यांनी बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. त्यांच्यासमवेत भाजपचे जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, उरण तालुका उपाध्यक्ष पंडित घरत, नवीन शेवा अध्यक्ष महेंद्र म्हात्रे, भगवान घरत, राकेश भोईर, विवेक म्हात्रे, किशोर पाटील उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जनार्दन म्हात्रे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.** (छाया : चेतन पोपेटा)

# अनोळखी मोबाईल नंबरपासून होणार सुटका

## फोन आल्यावर दिसणार समोरच्या व्यक्तीचे नाव



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण म्हणजेच 'ट्राय'कडून आता लवकरच एक महत्त्वाची सेवा सुरू केली जाणार आहे. आता जो व्यक्ती कॉल करेल त्याचे नाव मोबाईल फोनमध्ये सेव केलेले नसले तरीही ते दिसणार आहे. यामुळे अनोळखी मोबाईल नंबरपासून सुटका होणार आहे.

अनेक वेळा अनोळखी नंबरवरून आलेले कॉल उचलण्याचा कंटाळा येतो, तर काहींना अनोळखी नंबरची भीतीदेखील वाटते, पण आता सरकारकडून एक अशी सुविधा अमलात आणली जाणार आहे, ज्यामुळे अनोळखी नंबरपासून सुटका होणार आहे.

'ट्राय'च्या नव्या नियमानुसार आता जर एखाद्या व्यक्तीला नवीन सिमकार्ड घ्यायचे असेल तर त्यासाठी भरण्यात येणाऱ्या केवायसी फॉर्मवर त्याला स्वतःची सर्व खरी माहिती भरावी लागेल. शिवाय त्या फॉर्मवर सिमकार्ड वापरकर्त्याचे जे नाव असेल तेच नाव त्या व्यक्तीने इतरांना कॉल केल्यावर दिसणार आहे. यामुळे अनोळखी नंबरमुळे होणारा त्रास टळणार आहे.

### 'ट्राय'ची केवायसी आधारित सेवा

अनोळखी नंबरवरून आलेल्या कॉलमुळे अनेक लोकांची आर्थिक फसवणूक झाल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे आता अनोळखी नंबरवरून लोकांची फसवणूक करणाऱ्यांवर काही प्रमाणात आळा बसणार आहे. दरम्यान, सध्यादेखील अनोळखी नंबर कोणाचा आहे हे पाहता येते. त्यासाठी ट्रयू कॉलरसारख्या अ‍ॅप्सचा वापर होतो, मात्र या अ‍ॅप्ससाठी मोबाईलमधील डाटा लागतो. शिवाय काही अ‍ॅप ते देत असलेल्या सेवेचे मूल्यदेखील आकारतात. या अ‍ॅप्सद्वारे मिळणारी माहिती पूर्णपणे खरी असेल असा दावाही करता येत नाही. त्यामुळे काही प्रमाणात फसवणूक होण्याची शक्यता असते, परंतु 'ट्राय'द्वारे केवायसी आधारित जी सेवा सुरू करण्यात येणार आहे त्याद्वारे ग्राहकांना अचूक माहिती मिळणार आहे.

## प्रतापगड कबर परिसर पूर्णपणे अतिक्रमणमुक्त

**वाई : प्रतिनिधी**

प्रतापगडाच्या पायथ्याला अफझल खान कबर परिसरात महसूल व वन विभागाच्या संयुक्तिक कारवाईत संपूर्ण परिसरातील पाडलेल्या बांधकामांचे डबर, माती, पत्रे व लोखंड हटविण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले. अनेक वर्षे प्रलंबित असलेली कारवाई पूर्ण होत असल्याने शिवप्रेमींमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

प्रतापगडाच्या पायथ्याशी ज्या चौथऱ्यावर अफझल खान कबर आहे तेथील सुमारे चार फूट चौथरा वन विभागाच्या हद्दीत येत असल्याने हा चौथरा मोकळा करण्याचे काम बुधवारी (दि. १६) सलग चौथ्या दिवशी सुरू होते. अफझल खान व सय्यद बंडा यांच्या कबरीवरील चादर व मोरपीस हटवून खऱ्या अर्थाने हा परिसर अतिक्रमण व उदात्तीकरण यापासून मुक्त करण्यात आला आहे.



# पालीत माकडांचा उच्छाद; नागरिक त्रस्त





**सुधागड : रामप्रहर वृत्त**

अष्टविनायकांपैकी एक क्षेत्र आणि सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पालीमध्ये माकडांनी अक्षरशः उच्छाद मांडला आहे. त्यामुळे नागरिक हैराण झाले असून या माकडांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी पालीकर करीत आहेत.

पाली बाजारपेठ, मधली आळी, खडक आळी, कासार आळी, सोनार आळी, आगर आळी, बेगर आळी अशा सर्वच गजबजलेल्या भागात माकडे नित्यनेम धुमाकूळ घालत आहेत. ही माकडे छतावर उड्या मारून घराचे पत्रे व कौले फोडतात. ड्रेनेजचे पाईप, विजेच्या तारा, गच्चीत ठेवलेले सामान, पाण्याच्या टाक्या, झाडे व कुंड्या यांचे अतोनात नुकसान करीत आहेत.

माकडांमुळे घराबाहेर कोणत्याही गोष्टींचे वाळवण घालता येत नाही. इतकेच नव्हे; तर घराची दारे-खिडक्या उघड्या ठेवणेही अवघड झाले आहे. घरात शिरून माकडे अन्नधान्य, भाजीपाला यांची नासाडी करतात. वाळत घातलेले कपडेदेखील फाडून टाकतात. त्यामुळे मोठी आर्थिक हानी होत आहे. अनेकदा ही माकडे वाहनांवरदेखील उड्या मारतात, तर कधी टेरेसच्या पत्र्यावर धुडगूस घालतात. त्यामुळे या माकडांचा बंदोबस्त करण्याची जोरदार मागणी होत आहे.

# खूर्चीसाठी बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली

## बाळासाहेबांच्या शिवसेनेचे प्रवक्ते नरेश म्हस्केंचे राऊतांना प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बाळासाहेब ठाकरेंच्या स्मृतीस्थळाला भेट देण्यावरून खासदार संजय राऊतांनी टीका केल्यानंतर आता शिंदे गटाने प्रत्युत्तर दिले आहे. वारसा हा फक्त रक्ताच्या नात्याचा नसतो, तर विचारांचाही असतो. तुम्ही खूर्चीसाठी बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली दिली. त्यामुळे आम्हाला बोलण्याचा तुम्हाला अधिकार नाही, असे शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के म्हणाले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्व. बाळासाहेब ठाकरेंच्या स्मृतीस्थळाला भेट देणार असल्याच्या मुद्दावरून संजय राऊत, बाळासाहेब ठाकरे हे या देशाचे आणि विश्वाचे आहेत. फक्त आपल्या हातातले खंजीर बाजूला ठेवा आणि मग स्मारकाला हात जोडायला जा, असे म्हणाले. याबाबत नरेश म्हस्के यांनी राऊतांना प्रत्युत्तर दिले आहे. संजय राऊतांनी आधी बाळासाहेबांचे हिंदुत्ववादी विचार बाजूला ठेवण्यासाठी प्रेरणा कुठून मिळाली हे सांगावे, मगच बाळासाहेबांच्या समाधीपुढे नतमस्तक व्हावे. आम्हाला बोलण्याचा तुम्हाला अधिकार नाही. बाळासाहेबांच्या हिंदुत्ववादी विचारांच्या पाठीत खंजीर कोणी खुपसले हे संजय राऊत यांनी सांगावे. सत्तेसाठी, खुर्चीसाठी बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली कोणी दिली? खुर्चीसाठी आपण बाळासाहेबांचे विचार बाजूला ठेवून काँग्रेस, राष्ट्रवादीशी आघाडी केली. बाळासाहेबांनी आयुष्यभर काँग्रेसला बाजूला ठेवण्यासाठी कष्ट घेतले आणि आदित्य ठाकरे राहुल गांधींसोबत यात्रा करीत आहेत. ज्या छगन भुजबळांनी बाळासाहेबांना सर्वात जास्त त्रास दिला, पोलीस कोठडीत टाकण्याचा प्रयत्न केला त्यांच्यासोबत 'मातोश्री'वर जेवत होतात.

दाऊदशी संबंध असलेल्या नवाब मलिकांशी आपण युती केली. शेवटपर्यंत आपल्या मंत्रिमंडळात ठेवेल, अशी टीका नरेश म्हस्के यांनी केली आहे.





### वारसा हा विचार, तत्त्वांचादेखील असतो

बाळासाहेबांचे विचार पुढे नेण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच करीत आहेत. त्यामुळे त्यांच्याबद्दल वाटेल ते बोलण्याचा आपल्याला नैतिक अधिकार नाही. आम्ही बाळासाहेबांचे विचार संपूर्ण देशात नेत आहोत. त्यामुळे खरा अधिकार बाळासाहेबांची शिवसेना पक्षातील शिलेदारांचा आहे. वारसा हा फक्त घराण्याचा नसतो, तर तो विचारांचा, तत्वांचादेखील असतो, असेही ते म्हणाले आहेत.

# किल्ले रायगड विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य -ना. लोढा

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड विकास प्राधिकरणमार्फत रायगड किल्ला विकासासाठी पर्यटन विभागाकडून सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी प्राधिकरणचे अध्यक्ष संभाजी राजे छत्रपती यांना दिली.

गड-किल्ल्यांच्या विकासाबाबत पर्यटनमंत्रीलोढा यांच्या उपस्थितीत बैठक बुधवारी (दि. १६) झाली. या वेळी पर्यटन सचिव सौरभ विजय, पर्यटन संचालनालयाचे संचालक बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी, सहसंचालक धनंजय सावळकर उपस्थित होते.

मंत्री लोढा म्हणाले, शिवराज्याभिषेक सोहळ्याला २०२४मध्ये या वर्षी ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे छत्रपती शिवरायांचा इतिहास नव्या पिढीला माहिती व्हावा, यासाठी प्रतापगडावर छत्रपती शिवरायांचा पराक्रमाची माहिती देणारे देखावे उभारण्यात येतील, तसेच लेझर शोचेदेखील आयोजन करण्यात येईल.



रायगड विकास प्राधिकरणचे अध्यक्ष संभाजीराजे म्हणाले, रायगड विकास प्राधिकरणमार्फत रायगड किल्ला व परिसरात विविध विकासकामे चालू आहेत. दोन निवासी खोल्यांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले आहे. सहयोग करारानुसार हस्तांतर लवकर करावे, तसेच जे बांधकाम पूर्ण झाले आहे तेदेखील प्राधिकरणास प्राप्त झाले, तर पुढील कामे करता येतील. पाचाड येथे ८८ एकर जागेत शिवसृष्टी, मराठा संशोधन केंद्र, पर्यटक सुविधा केंद्र, अत्याधुनिक संग्रहालयाची उभारणी होणार आहे. एमटीडीसीमार्फत येथे सामंजस्य कराराद्वारे पर्यटक निवास केंद्राची उभारणी व्हावी. महाड- रायगड हा राष्ट्रीय महामार्ग हेरिटेज हायवे करण्यास मंजुरी मिळाली आहे. एमटीडीसी, रायगड प्राधिकरण, केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालय यांचे करारद्वारे येथे पीपीपी मॉडेल अंतर्भूत करून प्रकल्प पूर्ण होऊ शकतो का, ते पहावे अशा सूचना संभाजी राजे छत्रपती यांनी केल्या.

याबाबत मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी, रायगड किल्ला हा पर्यटकांचे आकर्षण आहे. विकास प्राधिकरणमार्फत सुरू असलेल्या विकासकामांबाबत पर्यटन विभाग मदत करेल, असे आश्वासन दिले.

# शेती महामंडळाच्या जमिनीचे बाह्यस्त्रोताद्वारे सर्वेक्षण करावे : राधाकृष्ण विखे-पाटील

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनींचे संरक्षण होऊन त्यांचा सुयोग्य वापर करणे आवश्यक आहे. त्यासाठी महामंडळाच्या जमिनीचे बाह्यस्त्रोताद्वारे तातडीने सर्वेक्षण करण्यात यावे, असे निर्देश महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले.

या संदर्भात महसूलमंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. १६) मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. नितीन करीर यांच्यासह राज्य शेती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विश्वजीत माने, अतिरिक्त जिल्हाधिकारी रुपाली आवळे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.



विखे- पाटील म्हणाले की, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाने वाटप, जमिनीचे ७/१२ करण्याची प्रलंबित प्रकरणे, अतिक्रमण प्रकरणे, जमीन मोजणी आदींना प्राधान्य द्यावे. अहमदनगर जिल्ह्यातील राहता तालुक्यातील निमगांव कोऱ्हाळे, साकुरी आणि शिर्डी येथील जमिनींसंदर्भातील सार्वजनिक प्रयोजनासाठी प्राप्त झालेले विविध प्रस्ताव संचालक मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करून याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची आकारीपड जमिन, अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर येथील हरिगांव येथील शेती महामंडळाच्या मालकीच्या क्षेत्रामध्ये सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करणे, एक एकरपेक्षा कमी देय क्षेत्र असल्याने अपात्र ठरलेल्या खंडकरी यांना क्षेत्र वाटप करण्यासाठी धोरण ठरविणे, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मालमत्तेचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार करणे तसेच याबाबत एक आराखडा तयार करणे आदी विषयांवर या वेळी चर्चा करण्यात आली.

# मुख्यमंत्री शिंदे यांनी घेतली प्रकाश आंबेडकरांची भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांची बुधवारी (दि. १६) सदिच्छा भेट घेतली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रकाश आंबेडकर यांच्या राजगृही भेट घेतली. या वेळी मंत्री दीपक केसरकर आणि खासदार भावना गवळीही उपस्थित होत्या. या भेटीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, यामध्ये कुठलेही राजकीय समीकरण नाही, ही निव्वळ सदिच्छा भेट होती. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशाचे भूषण आणि त्यांचे वास्तव्य असलेली ही वास्तू एवढेच या भेटीत होते. या भेटीमध्ये राजकीय चर्चा झाली नाही. त्यावेळच्या वापरातल्या वस्तू, ही इमारत बाबासाहेबांच्या संकल्पनेतून उभी राहिली आहे, त्यावेळीची त्यांची वाचनाची खोली, अभ्यासाचा टेबल, खूर्ची त्यांची पुस्तके त्यांच्या वापरातल्या वस्तू हा आपला ऐतिहासिक ठेवा आहे. तो आज मुख्यमंत्री म्हणून पाहायला मिळाला. मी आज सदिच्छा भेट घेतली आहे. या वास्तूचे पावित्र्य हे बाबासाहेबांचे वास्तव्य आणि पदस्पर्शाने पुनित झाले आहे, असे मुख्यमंत्री या वेळी म्हणाले.



## कल्याण रेल्वे पोलिसांनीच केली चरसची विक्री

**कल्याण : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे मार्गावरील कल्याण रेल्वे पोलीस ठाण्यातील दोन पोलिसांनीच अंमलीपदार्थांची तस्कर केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कल्याणमधील दुर्गाडी येथे चरसची विक्री करताना ठाणे शहराच्या गुन्हे शाखा आणि अमलीपदार्थ विरोधी पथकाने मंगळवारी (दि. १५) ही कारवाई केली.

याप्रकरणी कल्याणमधील बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पोलीस हवालदार महेश वसेकर आणि पोलीस शिपाई रवी विशे यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून सुमारे दोन लाख रुपये किंमतीचा ९२१ ग्रॅम चरस जप्त करण्यात आला, तसेच इतर संशयितांची चौकशी सुरू आहे.

## चिरनेर आश्रमशाळेत बाल दिन साजरा

**उरण : वार्ताहर**

चिरनेर येथील आदिवासी मुलांच्या आश्रमशाळेत रोटरी क्लब ऑफ नवी मुंबईच्या विद्यमाने पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्ताने बाल दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डी. वाय. पाटील हॉस्पिटलच्या अधीक्षक प्राची नायर यांनी भूषविले. पं. जवाहरलाल नेहरूंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात केली. या वेळी अधीक्षक प्राची नायर यांनी बालपणीच्या आठवणींनाही उजाळा दिला, तर भाजपचे विद्यमान पदाधिकारी तथा चिरनेर ग्रामपंचायतीचे विरोधी पक्षनेते रमेश फोफेरकर यांनी, आदिवासी कल्याण विभागाच्या वतीने युवक युवतींच्या शारीरिक सदृढता विकास व क्रीडा कौशल्य विकासासाठी अनुदान योजना आहेत, त्याचा लाभ घेतला पाहिजे, असे नमूद केले.

या वेळी प्रभाकर डेकाटे, दिलीप गुप्ते, सदानंद सुब्रमण्यम, अनंतराम राव, मुकेशकुमार श्रीवास्तव, मदन त्रिपाठी, अनिल गोविंदाने, आनंदकुमार सक्सेना, रीना सक्सेना, प्राची नायर, रमेश फोफेरकर, भाजपचे अर्जुन मोकल, मनोहर ठाकूर, मुख्याध्यापक आप्पासाहेब मोरे अधीक्षक सतीश मोरे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन महादेव डोईफोडे यांनी केले.



## भाजप वैद्यकीय आघाडीतर्फे पत्रकारांसाठी सर्व रोगनिदान शिबिर

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या वैद्यकीय आघाडी महाराष्ट्र प्रदेशतर्फे शनिवारी (दि. १९) मुंबईतील सर्व पत्रकार बंधू-भगिनींसाठी मोफत सर्व रोगनिदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

पत्रकार हे आपल्या संविधानाचा चौथा स्तंभ म्हणून ओळखले जातात. आपल्या चॅनल, वृत्तपत्रांच्या माध्यमातून ते सामान्यांच्या समस्या शासनापर्यंत पोहचविण्याचे काम करीत असतात. अनेक हे काम करताना त्यांना आपल्या जीवावर उदार व्हावे लागते. त्यामुळे त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे असल्याने शिबिराचे आयोजन केल्या सांगिण्यात आले. या शिबिरात दात, तोंडाचे आजार, कान, नाक, घसा आजार, नेत्रचिकित्सा, स्त्री रोग, मधुमेह चिकित्सा, नॅचरोपॅथी, आयुर्वेद व होमिओपॅथी चिकित्सा, हृदयरोगाशी संबंधित प्राथमिक तपासणी, हाडांची तपासणी, फुफ्फुसाच्या चाचण्या, लिपीड प्रोफाईल, मुत्रपिंडकार्य चाचणी, यकृत चाचणी, ईसीजी, शुगर तपासणी तसेच विविध आजारांवरील समुपदेशन व औषधे देण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे शिबिरात मधुमेह तज्ज्ञ डॉ. जगन्नाथ दिक्षीत यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

शिबिर शनिवारी (दि. १९) सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत नरीमन पॉईंट येथील भाजपच्या प्रदेश कार्यालयात होणार आहे. शिबिराचा जास्तीत जास्त पत्रकार बंधू-भगिनींनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'गोवरची लक्षणे आढळल्यास आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा'

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रातील लहान मुलांचे वेळोवळी लसीकरण करण्यात येते. त्यामुळे पनवेल महापालिका क्षेत्रात गोवरचे रूग्ण मिळण्याची शक्यता खूप कमी आहे. सध्या जे रूग्ण एमजीएम येथे उपचार घेत आहेत, ते मुंबईतील मुंब्रा येथील आहेत. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये. याव्यतिरिक्त लहान मुलांमध्ये गोवरची लक्षणे आढळल्यास महापालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

गोवर हा विषाणूपासून होणारा आजार आहे. गोवर विषाणू रुग्णांच्या खोकल्याद्वारे हवेमार्फत पसरतो व संपर्कात आलेल्या व्यक्तीच्या श्वसन संस्थेतून शरीरात प्रवेश करतो. गोवर झालेल्या रुग्णाच्या शरीरातील 'अ' जीवनसत्वाचे प्रमाण कमी होते. 'अ' जीवनसत्व कमी झाल्याने रुग्णाला डोळ्यांचे आजार व अतिसार, न्युमोनिया, मेंदूज्वर, असे आजार होऊ शकतात. गोवर झालेल्या रूग्णास लागोपाठ दोन दिवस 'अ' जीवनसत्वाची मात्रा दिल्यास हे आजार होण्याची शक्यता कमी असते. नागरिकांनी याबाबत जागरूक असणे गरजेचे आहे.

गोवर रोग टाळण्यासाठी लसीकरण हा प्रभावी मार्ग असून प्रत्येक शासकीय रुग्णालयामध्ये लस उपलब्ध आहे. लसीकरणाच्या वेळापत्रकाप्रमाणे लसीकरण केल्यास गोवर रोग टाळता येतो. बालकांचे गोवर/रुबेला लसीकरण झाले नसेल त्यांचे लसीकरण करून घेणेआवश्यक आहे. महापालिका क्षेत्रातील खासगी रूणालयांनी आपल्या रूग्णालयात अशा प्रकारचे रूग्ण आल्यास महापालिकेला कळविणे बंधनकारक असल्याचे प्रभारी मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर यांनी कळविले आहे.

### ही आहेत लक्षणे

ताप येणे, शरीरावर लाल पुरळ येणे, डोळे लाल होणे ही गोवरची सामान्य लक्षणे आहेत. गोवरच्या विषाणूंनी शरीरात प्रवेश केल्यानंतर सात ते दहा दिवसांनी लक्षणे दिसण्यास सुरुवात होतात. सुरुवातीस ताप व खोकला, सर्दी, डोळे लाल होणे यापैकी एक-दोन किंवा तीनही लक्षणे असू शकतात. दोन-चार दिवसानंतर सर्व अंगावर पुरळ येणे, ते कानाच्या मागे, चेहरा, छाती, पोटावर पसरतात. त्यामुळे वेळीच काळजी घेऊन संभाव्य धोके टाळता येऊ शकतात.

# उलवे नोड येथे सिडकोची महागृहनिर्माण योजना

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

नवी मुंबईला वास्तव्यासाठी नागरिकांकडून प्राधान्य देण्यात येते. त्यामुळेच सिडकोच्या वतीने परवडणाऱ्या किंमतीत आणि परिवहनाच्या उत्तम सुविधा असणारे दक्षिण नवी मुंबईतील उलवे नोड येथे महागृहनिर्माण योजना राबविण्यात येत आहे.

उलवे नोड हा दक्षिण नवी मुंबईतील वेगाने विकसित होणारा नोड आहे. या नोडचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे सिडकोतर्फे विकसित करण्यात येत असलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उलवे नोडमध्येच साकारण्यात येत आहे. यामुळे उलवे नोडला जागतिक नकाशावर मानाचे स्थान प्राप्त होणार आहे, तसेच उलवे नोड हा परिवहनदृष्ट्याही अत्यंत परिपूर्ण असा नोड आहे. सिडकोतर्फे विकसित करण्यात येत असलेल्या नेरूळ-उरण उपनगरीय रेल्वे मार्गावरील बामणडोंगरी आणि खारकोपर स्थानकांद्वारे उलवे नोड हा उर्वरित नवी मुंबई आणि मुंबईला जोडला गेला आहे.



मुंबई ट्रान्स हार्बर लिंकद्वारेही उलवे नोडला कनेक्टिव्हिटी लाभणार आहे. यामुळे उलवे नोड ते दक्षिण मुंबई काही मिनिटांच्या अंतरावर येणार आहेत.


उलवे नोडचे वाढणारे महत्त्व लक्षात घेता येथील घरांच्या किमती हळूहळू वाढत असल्या तरी येथे सिडकोतर्फे बांधण्यात येणारी परवडणाऱ्या दरातील घरे हा सर्वसामान्यांसाठी मोठा आधार ठरत आहेत. यापूर्वीही सिडकोतर्फे उलवे नोडमध्ये साकारण्यात आलेल्या उन्नती गृहनिर्माण योजनेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला होता. यानंतर सिडकोने पुन्हा एकदा उलवे नोडमध्ये घरे उपलब्ध करून दिली आहेत.

महागृहनिर्माण योजना दिवाळी-२०२२अंतर्गत सिडकोतर्फे नवी मुंबईतील उलवे नोडमधील बामणडोंगरी, खारकोपर पूर्व २ए, खारकोपर पूर्व २बी आणि खारकोपर पूर्व पी३ येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांकरिता परवडणाऱ्या दरातील ७,८४९ सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस २५ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे.

महागृहनिर्माण योजनेतील गृहसंकुलांना नेरूळ-उरण रेल्वे मार्गावरील बामणडोंगरी आणि खारकोपर रेल्वेस्थानकांद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. गृहसंकुलांचा परिसर हा शाळा, महाविद्यालये, रुग्णालय इ. मूलभूत सुविधांनी परिपूर्ण आहे. सिडकोच्या या महागृहनिर्माण योजनेद्वारे परिवहनदृष्ट्या समृद्ध असणाऱ्या उलवे नोडमध्ये परवडणाऱ्या दरातील घर घेण्याची संधी नागरिकांना प्राप्त झाली आहे.

## दुखवटा

### शशिकला पाटील



**नवी मुंबई** : शशिकला दिनानाथ पाटील यांचे अल्पशा आजाराने ऐरोली येथील रुग्णालयात निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ५५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. शशिकला पाटील यांच्यावर दिवा गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अत्यंत शांत आणि मनमिळावू स्वभावाच्या शशिकला पाटील यांच्या निधनाने कुटुंबासह परिसरात शोककळा पसरली आहे.


### नमुना एन. डी.

(नियम ९२(३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH46/CC/AUTO/2018/3164 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 AZ 7907 चे मालक **इरफान युसुफ आतार** यांचे तारीख २६/०६/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी श्रीमती सुलताना इरफान आतार, पत्ता- पोस्ट पाडा मोहल्ला, रुम नं. ०३, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ (महाराष्ट्र) उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/ प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/ प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

दिनांक : १७/११/२०२२

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - श्रीमती सुलताना इरफान आतार,**
पत्ता- पोस्ट पाडा मोहल्ला, रुम नं. ०३, ता. पनवेल,
जि. रायगड ४१०२०६ (महाराष्ट्र)

## निवडक

### रेल्वेगाडीत आढळला मृतदेह

**पनवेल :** रेल्वे स्टेशन फलाट क्र. ७ वर आलेल्या रोहा-दिवा शटल मेमो गाडीत एका महिलेचा मृतदेह आढळून आला असून तिच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत. मयत महिलेचे अंदाजे वय ६५ वर्षे, उंची पाच फूट पाच इंच, अंगाने मध्यम, रंग गोरा, चेहरा उभट, नाक सरळ, केस लाल व पांढरे असून तिच्या अंगामध्ये लाल ब्लाउज व सफेद साडी त्यावर लाल रंगाची डिझाईन आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (०२२-२७४६७१२२) किंवा पोलीस उपनिरीक्षक डी. एस. बदाले (९५९४९१२२९४) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** येथील रेल्वे स्टेशनसमोरील रिक्षा स्टँडच्या बाजूला उभी करून ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. शशिकांत पाटील (रा. करंजाडे) याने त्यांची १५ हजार रुपये किमतीची टीव्हीएस कंपनीची मोटार सायकल पनवेल रेल्वे स्टेशनसमोरील रिक्षा स्टँडच्या बाजूला उभी करून ठेवली होती. ही मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### झोपडपट्टीच्या मागे मृतदेह आढळला

**पनवेल :** रेल्वेस्टेशन रोडवरील नवनाथ नगर झोपडपट्टीच्या मागे एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ६० ते ६५ वर्षे, उंची अंदाजे ५ फूट, रंग काळा, डोक्याचे व दाढी मिशीचे केस काळे-पांढरे आणि वाढलेले, अंगावर कपडे नाहीत. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक अमोल चौगले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जेएनपीएचा अद्ययावतीसह सुसज्जीकरणावर भर

## शॅलो वॉटर बर्थ आणि कोस्टल बर्थचे 'जेएम बक्षी'कडे हस्तांतरण

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण अर्थात जेएनपीए हे भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर असून जेएनपीएने मंगळवारी (दि. १५) जेएम बक्षी पोर्ट्स अ‍ॅण्ड लॉजिस्टिक लिमिटेडसोबत शॅलो वॉटर बर्थचे अपग्रेडेशन सुसज्जीकरण आणि ऑपरेशन व देखभाल करण्यासाठी तसेच कोस्टल बर्थ पीपीपी मॉडेल वर चालविण्यासाठी सवलत करारावर स्वाक्षरी केली.



जेएनपीए हे भारतातील पहिले १०० टक्के लँडलॉर्ड असणारे बंदर बनले आहे. शॅलो वॉटर बर्थचे नूतनीकरण आणि कोस्टल बर्थचे व्यवस्थापन व संचालन जेएम बक्षी ग्रुपने स्थापन केलेल्या न्हावा शेवा डिस्ट्रिब्युशन टर्मिनल प्रायव्हेट लिमिटेड नावाच्या एसपीव्हीद्वारे केले जाईल. जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी व उपाध्यक्ष उन्मेश शरद वाघ, यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षरी करण्यात आल्या. या वेळी जेएम बक्षी ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक ध्रुव कृष्ण कोटक आणि जेएनपीएचे सर्व विभागाध्यक्ष होते.

या वेळी जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी म्हणाले, शॅलो वॉटर बर्थ आणि कोस्टल बर्थ आता पीपीपी टर्मिनल असतील, यासाठी जेएम बक्षी ग्रुपने यशस्वी बोली लावली होती. सवलतधारकाने हे टर्मिनल अपग्रेड करणे, सुसज्ज करणे, ऑपरेट करणे, देखभाल करणे आणि ३० वर्षांच्या कराराच्या कालावधीच्या शेवटी हस्तांतरित करणे आवश्यक आहे. टर्मिनल तीन वर्षांच्या एकाच टप्प्यात विकसित केले जाईल.

शॅलो वॉटर बर्थची क्षमता चार दशलक्ष मेट्रिक टन प्रतिवर्ष असून लांबी ४४५ मीटर आहे, त्यापैकी १२५ मीटर रो-रो टर्मिनल म्हणून विकसित करण्यात आले आहे. या बर्थ वर ३०,००० डीटी पर्यंतच्या जहाजांची हाताळणी केली जाऊ शकते ज्यामुळे हा बर्थ किनारपट्टीवरील तसेच परदेशी मालवाहतूकांसाठी सर्वात पसंतीची सुविधा ठरणार आहे. शॅलो वॉटर बर्थ एक मल्टि-कार्गो टर्मिनल आहे जे कंटेनर, सिमेंट, सामान्य मालवाहू आणि द्रव मालवाहू जहाजे परदेशी आणि किनारी दोन्ही हाताळण्यास सक्षम आहे.

या बहुउद्देशीय स्वच्छ कार्गो टर्मिनलचा यूएसपी म्हणजे रो-रो जहाजांद्वारे किनारी भागातील कंटेनर जोडण्याची क्षमता, न्हावा शेवाच्या जल-आधारित लॉजिस्टिक इको-सिस्टीममध्ये क्रांती घडवून हे देशातील सर्वांत कनेक्टेड हब बनले आहे. या बर्थमुळे देशातील दूरस्थ भागात पोहचण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

कोस्टल बर्थमुळे हरित चॅनेलद्वारे मालवाहतूक सुरळीत आणि जलद होण्यास मदत होईल आणि देशांतर्गत मालवाहतुकीमध्ये किनारी मालवाहतूकीचा वाटा वाढविण्यात मदत होईल आणि तसेच आयात-निर्यात (EXIM) समुदायाची सोय होईल. पोलाद, सिमेंट, कंटेनर, खते, अन्नधान्ये आणि काही इतर स्वच्छ कार्गो यांसारख्या प्रतिवर्षी सुमारे २.८ दशलक्ष मेट्रिक टन कोस्टल कार्गो हाताळण्याची क्षमता कोस्टल बर्थमध्ये आहे. मालाची साठवण आणि हाताळणीसाठी बर्थचे बॅकअप क्षेत्र ९ हेक्टर आहे.

> **जेएनपीएद्वारा पायाभूत सुविधांचा विकास केला जाईल. आज जगातील अनेक प्रमुख बंदरे ही लँडलॉर्ड असून फक्त विपणन कार्य करीत आहेत. जेएनपीएसुद्धा आता अधिक सुव्यवस्थित पद्धतीने विपणन कार्य हाती घेणार आहे, प्राधिकरणाने सामान्य बंदर व्यवसायाचा विकास केला आहे.**
> **-संजय सेठी, अध्यक्ष, जेएनपीए**

प्रकल्पाचा एक भाग म्हणून, जेएम बक्षी सिमेंटच्या साठवणुकीसाठी स्वयंचलित मशीनीकृत सिमेंट हाताळणी प्रणाली आणि कनेक्टेड कन्व्हेइंग आणि सायलो सुविधा प्रदान करेल ज्यामुळे जहाज वाहतूक गतिमान व सुगम होईल. नोव्हेंबर २०२० मध्ये पूर्ण झालेल्या कोस्टल बर्थचे उद्दिष्ट किनारपट्टीवरील मालवाहतूकीसाठी उत्तम पायाभूत सुविधा प्रदान करणे आणि रेल्वे व रस्ते मार्गावरील वाहतूकीचा भार कमी करणे तसेच किफायतशीर स्पर्धात्मक आणि प्रभावी मल्टी-मॉडल वाहतूक उपाय सुनिश्चित करणे हे आहे.

## नागाव उपसरपंचांसह सहकाऱ्यांची उरण न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

नागाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच भूपेंद्र घरत व त्यांच्या अन्य १० सहकाऱ्यांची धमकी दिल्याच्या खटल्यातून पुराव्याअभावी उरण न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे.

उरण पोलिसांनी ओएनजीसीच्या पीरवाडी येथील पिचिंगचे बांधकाम सुरू असताना भूपेंद्र घरत यांनी त्यांच्या सहकाऱ्यांनी डंपर अडवून फिर्यादी वैभव कडू व त्यांच्या सहकाऱ्यांना विविध आरोपांवरून ८ ऑगस्ट २०२० रोजी उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी चौकशी पूर्ण झाल्यानंतर भूपेंद्र घरत, प्रथमेश पाटील, विनित बोंबले, अमित म्हात्रे, प्रशांत पाटील, कल्पेश भोसले, समीर पाटील, मयुर भोईर, सागर म्हात्रे, मनिष पाटील, योगेश भोसले आदी ११ आरोपींच्या विरोधात उरण न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आला होता.

या फौजदारी खटल्याची सुनावणी मागील २१ महिन्यांपासून सुरू होती, मात्र सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाला पुरेसे पुरावे सादर करता आले नाहीत. शिवाय फिर्यादीनेच उलटतपासणीदरम्यान असा काही प्रकार घडला नसल्याचे न्यायालयात सांगितले. त्यामुळे पुराव्याअभावी उरण न्यायालयाचे न्यायदंडाधिकारी पी. एन. पठाडे यांनी ११ आरोपींची शिक्षाधिन आरोपातून निर्दोष मुक्तता केली आहे. सरकारी पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता ए. आर. कदम तर आरोपींतर्फे अ‍ॅड. अमर पाटील यांनी काम पाहिले.




**पनवेल : येथील व्ही. के. हायस्कूलमध्ये झालेल्या 'बामसेफ'च्या राष्ट्रीय मुलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या राज्यस्तरीय अधिवेशनात उद्घाटक म्हणून ज्येष्ठ अर्थतज्ञ जे. डी. तांडेल यांनी आपले विचार मांडले. या वेळी सभागृहात बहुजन बांधव उपस्थित होते.**

## भाजपच्या अशोक विखारेंवर समाजकंटकांकडून प्राणघातक हल्ला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे ग्रामपंचायतीच्या हद्दीत मंगेश शेलार यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते विविध विकासकामे या विभागात करीत आहेत. भाजपचे अशोक विखारे यांनी काही दिवसांपूर्वी सेक्टर ६ येथे रिक्षा स्टँन्डचे सुशोभीकरण केले होते. हाच राग मनात धरून काही समाजकंटकांनी अशोक विखारे यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. यामध्ये ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून यामागचा सूत्रधार सनी कैकाडी असल्याचे विखारे यांनी सांगितले आहे. कैकाडीच्या सांगण्यावरूनच कविश, रितेश गायकवाड आणि इतर दोन अनोळखी व्यक्तींनी अशोक विखारे यांची रिक्षा सेक्टर ३ कॉलेज फाट्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर आडवून शिवीगाळ आणि धमकी दिली तसेच ठार मारण्याच्या उद्देशाने गळ्यावर ब्लेडने वार करण्याचा प्रयत्न केला. आरोपी कविश याने बियरची बाटली विखारे यांच्या डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी केले.



## सीकेटी मराठी प्राथमिक विद्यालयात बालसभा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयात इयत्ता चौथीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनानिमित्त बालसभेचे आयोजन केले होते.

सर्वप्रथम स्वागतगीताने पाहुण्यांचे स्वागत झाले. बाल सभेस अथर्व टिंगरे हा प्रमुख पाहुणा व वरिष्ठ शिक्षक युवराज धनवटे हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. पाहुण्यांनी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या प्रतिमेचे पूजन केले व पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर सरस्वती देवीचे पूजन करण्यात आले आणि दीपप्रज्वलन करून पाहुणे स्थानापन्न झाले.

कार्यक्रमात हर्षद माने, श्रेयश शेट्टे व संजिवनी यादव यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याविषयी थोडक्यात माहिती सांगितली. त्यानंतर या कार्यक्रमानिमित्त काही विद्यार्थ्यांनी प्रदूषण टाळण्यासंदर्भात घोषवाक्ये ऐकवली व या घोषवाक्यांद्वारे प्रदूषण कसे टाळता येईल याबाबत जनजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रेया घेरडे व स्वरा भिसे यांनी केले. वर्गशिक्षक श्री. मेंगाळ यांनी सुंदर फलकलेखन करून वातावरण निर्मिती केली. श्री. देशमुख यांनी बालसभेच्या कार्यक्रमाचे नियोजन केले. अर्णव शिंदे याने उपस्थितांचे आभार मानले व शेवटी 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

## निसर्गाच्या सहवासात चित्रकला स्पर्धा रंगली

**उरण : बातमीदार**

उरण कला अध्यापक संघटना व जायंट्स ग्रुप वेल्फेअर फाउंडेशन उरण यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय भिकाजी गोविंद तांबोटकर यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त उरण शहरातील विमला तलाव बागेमध्ये भरलेल्या चित्रकला स्पर्धेत उरण तालुक्याच्या विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जायंट ग्रुपतर्फे अध्यक्ष विनायक पै, माजी अध्यक्ष रोशनलाल मेहता, माजी अध्यक्ष देवेंद्र पिंपळे तसेच सचिव योगेश म्हात्रे यांचे बहुमोलाचे सहकार्य लाभले. कलाअध्यापक संघटनेतर्फे अध्यक्ष अविनाश कदम, सचिव भूषण जाधव, जोशी सर, संतोष सर, राजश्री मॅडम, फातिमा मॅडम अशा अनेक कला शिक्षकांचे सहकार्य लाभले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून जगदीश नैकर, पद्मजा नैकर, चैत्राली चेतन ठक्कर यांनी परीक्षण करून विद्यार्थ्यांना पारितोषिके जाहीर केली.

या उपक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रायगड भूषण संगीता ढेरे यांचीही उपस्थिती लाभली तसेच पीएसआय माने हेही उपस्थित होते. १५८ विद्यार्थ्यांनी या चित्रकले स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. सर्व स्पर्धकांना खाऊवाटप व ज्यूस देण्यात आले. हा उपक्रम राबवण्यासाठी पंचायत समिती, नगरपालिका आणि पोलीस स्टेशन यांच्या परवानगीमुळे उत्तम प्रकारे साकार होऊ शकला. या उपक्रमाला उरण मधील ज्येष्ठ नागरिकांचा आशीर्वाद लाभला. प्रियवंदा तांबोटकर यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.



## जेएनपीए कामगार संचालकपदी दिनेश पाटील, रवींद्र पाटील





**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

जेएनपीए बंदरात नव्याने झालेल्या प्राधिकरणातील संचालक म्हणून दोन कामगार संचालकाची निवडणूक मंगळवारी (दि. १५) गुप्त मतदानाने झाली. या निवडणूकीचा निकाल रात्री जाहीर करण्यात आला आहे. या निवडणुकीत जेएनपीटी एकता कामगार संघटनेला प्रथम क्रमांकाची तर जेएनपीटी वर्कर्स युनियनला द्वितीय क्रमाकांची मते मिळाल्याने या दोन्ही संघटनेचे प्रतिनिधी प्राधिकरणाच्या सदस्यपदी निवडले जाणार आहेत. यामध्ये एकता संघटनेचे दिनेश पाटील आणि वर्कर्स युनियनचे रवींद्र पाटील यांची निवड होणार आहे, तर कॉ. भूषण पाटील यांचा पराभव झाला आहे.

जेएनपीटीसह देशातील ११ प्रमुख बंदरातील विश्वस्त मंडळ बरखास्त करून त्याजागी केंद्र सरकारने २०२१ रोजी बंदर प्राधिकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर प्राधिकरणाच्या १३ पैकी दोन कामगारांचे प्रतिनिधी गुप्त मतदानाने निवडून केंद्रीय कामगार आयुक्तांच्या देखरेखीखाली मंगळवारी निवडणूक प्रक्रिया घेण्यात आली. या वेळी जेएनपीएमधील एकूण ६५२ मतदारांपैकी ६४७ कामगारांनी मतदान केले. तर एक मत अवैध ठरले. मतदानाची ही टक्केवारी ९३.३३ टक्के होती.

यामध्ये एकता कामगार संघटनेला २९१, वर्कर्स युनियनला १६१, न्हावा शेवा बंदर कामगार संघटनेला १४३ तर चौथ्या संघटनेला ५१ मते पडली आहेत. निवडणुकीच्या निकाल नंतर विजयी झालेल्या जेएनपीटी एकता कामगार संघटनेचे दिनेश पाटील व जेएनपीटी वर्कर्स युनियचे रवींद्र पाटील यांच्या कामगारांनी आनंद व्यक्त केला.



**उरण : नगर परिषदेचे कर्मचारी तथा मुन्सिपल एम्प्लॉय युनियन कार्याध्यक्ष व नगरपालिका कर्मचारी सहकारी पतपेढीचे अध्यक्ष मधुकर भोईर यांचा ५०वा वाढदिवस पालिका कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. या वेळी मुख्याधिकारी राहुल इंगळे, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार आदी उपस्थित होते.**

## कळंबोलीत दिव्यांग मुलांतर्फे बाल दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कै. रघुनाथ आंबेरकर बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण संस्था संचलित रत्नमाला कर्णबधिर अथवा गतिमंद आणि विद्यामंदिर कळंबोली येथील कर्णबधिर व गतिमंद मुलांनी बाल दिनाचे औचित्य साधून कळंबोलीतील झोपडपट्टीत जाऊन तेथील मुलांची चित्रकला स्पर्धा घेतली.



प्रथम पाच क्रमांकांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले तसेच सर्व मुलांना भेटवस्तू (खेळणी) वाटप केले. केक कापून कार्यक्रमाची सांगता केली.

या संपूर्ण कार्यक्रमात सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांच्या मेसा ग्रुपचा सहभाग लाभला होता.

विशेष बालकांनी गरजू बालकांसाठी बाल दिन साजरा करून एक चांगला संदेश देण्याच काम केले आहे, असे मत संस्थेच्या अध्यक्ष माधुरी पंडित-आंबेरकर यांनी व्यक्त केले.

## संपादकीय

# प्रेरणेचा स्रोत

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाला भेट देण्यासाठी महाराष्ट्रातूनच नव्हे तर जगभरातून हिंदुधर्मीय एकवटावेत हे मराठी माणसाचे एक स्वप्न आहे. मराठी माणसाला स्वाभिमानाचे बाळकडू देणाऱ्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती कुठल्या एका पक्षाच्या नेत्या-कार्यकर्त्यांसाठी नाहीत तर ते प्रत्येक मराठी माणसाचे संचित आहे.

**शिवाजी पार्कजवळील महापौर बंगल्याच्या परिसरात स्व. बाळासाहेबांचे यथोचित् स्मारक उभारण्याचे काम सुरू आहे. येत्या वर्षभरात स्मारकाचे हे काम पूर्ण होईल, असा प्रयत्न आहे. या स्मारकासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळातच महापौर बंगल्याचा परिसर सरकारतर्फे उपलब्ध करून देण्यात आला. इतकेच नव्हे, तर त्यासाठी भरीव आर्थिक तरतूदही राज्याच्या तिजोरीतून करण्यात आली. काही दिवसांपूर्वी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी एक पत्रकार परिषद आयोजित करून स्व. बाळासाहेबांच्या नियोजित स्मारकाचे आरेखन आणि संकल्पना स्पष्ट केली होती. महापौर बंगल्याची वास्तू ऐतिहासिक वारसा मानला जात असल्यामुळे त्या इमारतीला हात न लावता स्व. बाळासाहेबांचे भूमिगत स्मारक विकसित करण्याची योजना त्यांनी सादर केली. त्या योजनेमध्ये नावे ठेवण्यासारखे काहीच नाही. बाळासाहेबांची छायाचित्रे, त्यांनी चितारलेली व्यंगचित्रे, त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घडामोडींसंदर्भातील दस्तावेज, अत्याधुनिक वाचनालय तसेच प्रेक्षागृह असा सुशोभित आराखडा सादर झाला आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची छायाचित्रेदेखील तिथे असणार आहेत, परंतु तोतये मुख्यमंत्री मात्र तेथे दिसणार नाहीत अशा आशयाचे तिरकस उद्गार उद्धव ठाकरे यांनी या प्रसंगी काढले होते. त्याला मात्र नावे ठेवावीच लागतील, परंतु हा झाला राजकारणाचा भाग. शिवसेनाप्रमुखांचे स्मारक हे वैयक्तिक हेवेदावे आणि खालच्या पातळीवरील राजकारण यामध्ये गुरफटू नये असे वाटते. कुठल्याही स्मारकाबाबत अशा प्रकारचा वाद झालेला खुद्द बाळासाहेबांनादेखील आवडला नसता. शिवसेना या पक्षाचा इतिहास या स्मारकामध्ये दृकश्राव्य पद्धतीने मांडण्याची कल्पना असल्याचे उद्धव ठाकरे यांनीच सांगितले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना टाळून शिवसेनेचा इतिहास कसा सांगता येईल याचे आकलन होण्यासारखे नाही. उमद्या मनाने राजकारणविरहित स्मारक हीच स्वर्गीय बाळासाहेबांना खरीखुरी आदरांजली ठरेल. यासंदर्भात भारतीय जनता पक्षाचे नेते आमदार प्रसाद लाड यांनी केलेल्या सूचनेवर विचार करता येऊ शकेल. शिवसेनाप्रमुखांचे स्मारक हे कुठल्याही खासगी ट्रस्टकडे न देता राज्य सरकारने आपल्या अखत्यारीतच घ्यावे अशी त्यांची सूचना आहे. सध्याच्या स्मारक समितीच्या प्रमुखपदी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हेच अजूनही आहेत. तथापि स्व. बाळासाहेबांचे स्मारक हे कुठल्याही एका व्यक्तीची, परिवाराची अथवा पक्षाची मक्तेदारी होऊ शकत नाही. कारण शिवसेनाप्रमुखांच्या विचारांचा वारसा जगभरातील मराठी माणसांच्या नसानसांपर्यंत पोहोचला आहे. ज्या स्मारकासाठी राज्य सरकारने भूखंड उपलब्ध करून दिला, आर्थिक तरतूद करून दिली, ते स्मारक राज्य सरकारच्याच ताब्यात राहिले पाहिजे या अपेक्षेला वावगे म्हणता येणार नाही. आता यातदेखील राजकारण शोधण्याचा प्रयत्न होईल. तसे घडले तर त्याच्यासारखे दुर्दैव नाही. सारे राजकारण बाजूला ठेवून, गुरूवारच्या स्व. बाळासाहेबांच्या दहाव्या स्मृतीदिनानिमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मारकाच्या जागेला आवर्जून भेट दिली. त्यांच्या मनातील खुलेपणा उघड झाला आहे. त्यांचे अनुकरण अन्य नेत्यांनीही करावे.**

# ई-श्रम कार्ड योजना असंघटित कामगारांसाठी आधार




असंघटित कामगारांच्या सुरक्षेसाठी आणि शासकीय अनुदान देताना येणाऱ्या अडचणी सोडविणे, यासाठी शासनाने असंघटित कामगारांची नोंदणी करण्याचे ठरविले असून असंघटित कामगारांचा राष्ट्रीय स्तरावर डाटाबेस तयार करण्याकरिता केंद्र शासनाने ई-श्रम पोर्टल तयार केले आहे.

त्यासाठी असंघटित कामगार नोंदणीचा महामहोत्सव सुरु झाला आहे. जिल्ह्यात नागरी सुविधा केंद्रामार्फत ऑक्टोबर २०२१पासून नोंदणीचे कामकाज सुरू करण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील ज्या असंघटित कामगारांनी अद्याप ई-श्रम पोर्टलवर नोंदणी केलेली नाही, अशा असंघटित कामगारांनी www.eshram.gov.in या लिंकद्वारे ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आणि रायगड कामगार उपायुक्त प्र. ना. पवार यांनी केले आहे.

**योजनेचे लाभ** : असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचा लाभ मिळेल. शासन असंघटित कामगारांच्या कार्यशक्तीचा मागोवा घेऊन त्यांच्या क्षमतेप्रमाणे त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देईल. शासनाला असंघटीत कामगारांसाठी धोरण व कार्यक्रम राबविण्यात मदत होईल, त्या धोरणांचा फायदा भविष्यात त्यांनाच होईल. कार्ड तयार केल्यास असंघटित कामगारांना सरकारकडून एका वर्षांसाठी विमा मोफत दिला जाईल, तसेच असंघटित कामगारांसाठी अनेक योजना व संधी उपलब्ध करण्यासाठी केंद्र सरकार विचाराधीन आहे.

**असंघटित कामगार म्हणजे कोण?**

लहान आणि सीमांत शेतकरी, शेतमजूर, पशुपालन करणारे, सेल्समन, बांधकाम कामगार, सेंट्रिंग कामगार, किराणा, बेकरी, पानपट्टी इत्यादी सर्व दुकानदार, सुतार, वीटभट्टीवर काम करणारे, न्हावी, घरगुती कामगार, भाजीपाला विक्रेते, फळविक्रेते, वृत्तपत्र विक्रेते, हातगाडी ओढणारे, ऑटो रिक्षा चालक, घरकाम करणारे कामगार, आशा वर्कर, दूध उत्पादक शेतकरी, सामान्य सेवा केंद्रचालक, स्थलांतरित कामगार, अंगणवाडी सेविका, खासगी क्लासेस संचालक, विडी कामगार यासारखे असे अनेक लोक आहेत ज्यांची शासनाकडे नोंद नाही. त्यामुळे आपत्ती आली असता किंवा काही नुकसान झाले असता त्यांच्यासाठी शासन काहीही करू शकत नाही, म्हणून शासन या नोंदणीच्या माध्यमातून अशा लोकांना एक यूएएन (एक विशिष्ट नंबर) देणार आहे. ई-श्रम कार्ड (आधार कार्डसारखे कार्ड) देणार आहे. ज्यामुळे या लोकांना एक ओळख मिळणार असून शासनाचे अनेक लाभ मिळण्यास सोपे होणार आहे.

**ई-श्रम नोंदणीसाठी निकष** : संबंधित व्यक्ती १८ ते ५९ वय असणारी असावी, ती व्यक्ती आयकर भरणारी नसावी, ती व्यक्ती ईपीएफओ व ईएसआयसीची सदस्य नसावी, वर नमूद कामगार क्षेत्रात काम करणारी असावी.

**ई-श्रम नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे** : आधार कार्ड, मोबाइल नंबर, बँक पासबूक, शैक्षणिक माहिती.

असंघटित कामगारांची आपली आणि आपल्या कुटूंब सदस्यांची ई-श्रम कार्ड नोंदणी करून घेवून विविध सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर आणि रायगड जिल्हा कामगार उपायुक्त प्र. ना. पवार यांनी केले आहे.

**-मनोज शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी, रायगड**

# व्यायाम करताना अशी घ्या काळजी

दोनच दिवसांपूर्वी सिद्धार्थ सूर्यवंशी (वय ४६) यांचा व्यायाम करताना जिममध्ये हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला, तसेच गेल्या वर्षी कर्नाटकातील कन्नड चित्रपटांचा सुपरस्टार पुनीथ राजकुमार यांचेही जिममध्ये असताना हृदयविकाराने निधन झाले. हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी ते जिममध्ये व्यायाम करीत होते. भारताचे माजी कर्णधार व यशस्वी क्रिकेटपटू सौरभ गांगुली यांना हृदयविकाराचा झटका आला होता. प्रसिद्ध सिनेकलाकार सिद्धार्थ शुक्ला याचेही वयाच्या चाळीसाव्या वर्षी निधन झाले होते.

ऐन चाळीशीमध्ये हृदयविकार वाढण्याचे प्रमाण भारतामध्ये वाढत असून अतिरिक्त व्यायाम व डाएट फूड कोठेतरी कारणीभूत ठरत आहे. उत्तम प्रकृती असलेल्या या लोकप्रिय कलाकाराची वयाच्या ४६व्या वर्षी एक्सिस्ट ही नक्कीच दुःखदायक आहे. म्हणूनच चाळीशी पार केल्यानंतर जिम अथवा कार्डिओ ट्रेनिंग घेणाऱ्यांनी शारीरिक तपासणी करणे गरजेचे असल्याचे मत वैद्यकीय क्षेत्रातून व्यक्त होत आहे. हृदयाचे ठोके जोपर्यंत चालू असतात, तोपर्यंत माणूस जिवंत असतो. मग या इतक्या महत्त्वाच्या अवयवाची आपण नीट काळजी घ्यायलाच हवी. याविषयी अधिक माहिती देताना नेरुळ येथील शुश्रूषा हार्ट केयर व स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक व हृदय शल्यविशारद डॉ. संजय तारळेकर म्हणाले, मॉडेल सिद्धार्थ अथवा पुनीथ राजकुमारला व्यायाम करताना हृद्यविकाराचा झटका येणे ही काही पहिली घटना नाही, यापूर्वीही अशा अनेक घटना घडल्या आहेत. अनेक वेळा तर मॅरेथॉन स्पर्धेत युवा स्पर्धकांचा हृदयविकाराने मृत्यू झाला आहे. जर आपण या यशस्वी कलाकारांचे उदाहरण घेतल्यास ते शरीराने तंदुरुस्त होते, तसेच त्यांचा आहार चांगल्या प्रतीचा होता, परंतु अचानक कोणतीही लक्षणे नसताना त्याना हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाला. यामध्ये सेलेब्रिटीच नाही तर अनेक सामान्य नागरिकसुद्धा अशा हृदयविकाराला बळी पडले आहेत. म्हणूनच हृदयाची तंदुरुस्ती फारच महत्त्वाची आहे.



हृदय संपूर्ण शरीरात तसेच स्वतः मध्ये रक्त वाहून नेते. यासाठी हृदयात तीन कोरोनरी धमन्या असतात, जेव्हा यापैकी कोणत्याही किंवा तीन धमन्यांना ७५ टक्केपेक्षा जास्त रक्त पुरवठा अचानक कमी होतो, तेव्हा त्याला हृदयविकाराचा झटका म्हणतात. याचा अर्थ असा की, रक्तात ऑक्सिजनची मागणी आणि पुरवठा यांच्यात किंवा अप्रत्यक्षपणे विसंगती असल्यास हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. झटका येण्यामध्ये अनेक कारणे आहेत. यामध्ये अति धूम्रपान, मद्यपान, झोपेचा अभाव, मानसिक ताणतणाव, आधुनिक डाएट पद्धती, शरीर डौलदार दिसण्यासाठी प्रोटीन व स्टिरॉईडचे अतिसेवन कारणीभूत आहेत. कधीकधी चोर पावलांनी मधुमेह- उच्च रक्तदाब यांचा शरीरात प्रवेश झालेला असतो, परंतु याची कल्पना आपल्याला नसते, परंतु हे शत्रू तुमचे हृदय पोखरायला सुरुवात करतात. तुमचे हृदय हे तुम्हाला संकेत देत असते. निद्रानाश, श्वास घेण्यास अडचण, आंबट ढेकर, हाता-पायांना सूज येणे अशी लक्षणे आढळल्यास त्वरित शारीरिक तपासणी करणे गरजेचे आहे. व्यायामाला जाण्यापूर्वी आपले हृदय कुमकुवत तर नाही ना याची तपासणी करणे गरजेचे आहे.

डौलदार शरीर कोणाला आवडत नाही? परंतु या डौलदार शरीराचा मुख्य दुवा हे तुमचे हृदय असते याचाच विसर पडत आहे. एखादा रियालिटी शो अथवा मालिका बघितल्यावर त्यातील सिक्स पॅक असलेल्या हिरोसारखे आपण पण दिसले पाहिजे या भावनेतून अनेक जण जिममध्ये जातात, परंतु आपल्या शरीराची किती झीज झाली आहे, आपल्या सांध्याचे तसेच हृदयाचे आरोग्य कसे आहे याची चाचपणी करीत नाही. जिमला जाण्यापूर्वी रात्री शांत आणि पुरेशी झोप आवश्यक असते, तसेच आहार व जिम करण्यामध्ये कमीत कमी एका तासाचे अंतर हवे. आपल्याला झेपत असेल तेवढाच व्यायाम करावा. त्वरित रिझल्टसाठी अतिव्यायाम टाळावा, जममध्ये व्यायाम सुरू करण्याच्या अर्ध्या तासाआधी कमीत कमी ५०० एमएल पाणी पिणे गरजेचे आहे. म्हणजे पोटभर पाणी पिऊन जाऊ नका, अशी माहिती तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेन्टरचे हृदयविकारतज्ज्ञ डॉ. तमिरुद्दीन दानवडे यांनी दिली.

**-उमेश भोगले**



## बदलते तंत्रज्ञान

# डेटा संरक्षण विधेयकात झाले मोठे बदल

प्रस्तावित डेटा संरक्षण विधेयक ग्राहकांशी संबंधित डेटाच्या गैरवापराला आळा घालेल आणि दोषींवर दंडात्मक कारवाईची तरतूद करेल. 'गुगल' या महाकाय इंटरनेट कंपनीवर अमेरिकेतील ग्राहकांच्या डेटाचा गैरवापर केल्याच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी ही माहिती दिली आहे.

ग्राहकांच्या वैयक्तिक डेटाचा व्यवहार करणाऱ्या कंपन्या डेटाचे उल्लंघन रोखण्यासाठी वाजवी सुरक्षा पाळण्यात अयशस्वी ठरतील, त्यांना डेटा संरक्षण विधेयकाच्या सुधारित नियमांतर्गत सुमारे २०० कोटी रुपयांपर्यंत दंड आकारला जाऊ शकतो. डेटा संरक्षण विधेयकातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी प्रस्तावित एक संस्था कंपन्यांना सुनावणीची संधी दिल्यानंतर, दंड आकारण्याचे अधिकार दिले जाण्याची शक्यता आहे.

ग्राहकांचा वैयक्तिक डेटा हाताळणाऱ्या आणि त्यावर प्रक्रिया करणाऱ्या संस्थांद्वारे डेटाचे पालन न झाल्यास त्यावर कारवाईची शक्यता आहे. डेटाच्या उल्लंघनामुळे प्रभावित झालेल्या लोकांना सूचित करण्यात अयशस्वी झालेल्या कंपन्यांना सुमारे १५० कोटी रुपयांचा दंड ठोठावला जाऊ शकतो आणि मुलांच्या वैयक्तिक डेटाचे संरक्षण करण्यात अयशस्वी ठरलेल्या कंपन्यांना सुमारे १०० कोटी रुपयांचा दंड होऊ शकतो. या वर्षाच्या सुरुवातीला मागे घेण्यात आलेल्या विधेयकाच्या नियमांत कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल कंपनीवर १५ कोटी रुपये किंवा तिच्या वार्षिक उलाढालीच्या चार टक्के इतका दंड आकारला जाऊ शकत होता.

सरकार सुधारित विधेयकाला अंतिम रूप देण्याच्या जवळ असल्याचं बोलले जाते. या विधेयकाला डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन बिल म्हणून संबोधलं जाणार आहे. या आठवड्यात विधेयकाचा अंतिम मसुदा तयार होण्याची शक्यता आहे. नवीन विधेयक केवळ वैयक्तिक डेटाच्या आसपासच्या सुरक्षेशी संबंधित आहे. गैर-वैयक्तिक डेटा त्याच्या कक्षेतून वगळण्यात आला आहे. विधेयकाच्या मागील नियमांत डेटाच्या गैरवापरासाठी दंड प्रभावी प्रतिबंधक म्हणून पाहिले गेले नाही. आता प्रस्तावित करण्यात आलेले दंड संस्थांना डेटाचं संरक्षण करण्यासाठी प्रवृत्त करतील.

इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी म्हणाले होते की, डेटाचा गैरवापर आणि डेटाचे उल्लंघन झाल्यास कंपन्यांना आर्थिक दंडाच्या स्वरुपात दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल.

# विद्यार्थ्यांच्या साथीने समाज घडवूया

**निमित्त**



विद्यार्थी संघटना, चळवळ, आणि त्याचे पडसाद यांच्या स्मृतींना उजाळा देण्याकरिता मागील ८० वर्षांपासून १७ नोव्हेंबर रोजी आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिवस पाळला जातो. हा दिवस साजरा करण्याऐवजी पाळला जातो असे म्हणण्याचे कारण म्हणजे याच दिवसाशी संबंधित एक दुर्दैवी घटनादेखील इतिहासात घडून गेली आहे.

नाझी काळात १७ नोव्हेंबर १९३९मध्ये झेकोस्लोव्हाकियावर नाझींनी केलेल्या आक्रमणाच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांनी निदर्शने काढत आंदोलने केली होती. या विद्यार्थ्यांवर पलटवार करताना नाझी सैन्याने नऊ जणांना जीवे मारण्यात आले, तर १२०० जणांची कॉन्स्न्ट्रेशन कॅम्पमध्ये रवानगी केली. यामध्ये अनेकांना निर्दयीपणे चिरडून टाकण्यात आले होते. या हुतात्म्यांची आठवण म्हणून हा दिवस जगभर पाळला जातो.

या घटनेनंतर चेकोस्लोव्हाकिया स्वतंत्र झाल्याने १९३९च्या उत्तरार्धात चार्ल्स विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकडून या दिवशी काही सांस्कृतिक प्रात्यक्षिके करून साजरा केला होता, मात्र आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिनाच्या नावाने हा दिवस पहिल्यांदा १९४१ साली इंटरनॅशनल स्टुडंट कौन्सिलतर्फे लंडनमध्ये साजरा करण्यात आला होता. कालांतराने इंटरनॅशनल युनियन ऑफ स्टुडंट्स आणि युरोपियन नॅशनल युनियन ऑफ स्टुडंट्स या संघटनांनीदेखील हा दिवस पाळण्यास सुरुवात केली.

या घटनेनंतरही याच दिवशी काही महत्त्वाच्या घटनादेखील योगायोगाने घडल्या. यामध्ये ग्रीसमधील अथेन्स पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी १९७३ साली तिथल्या लष्करी राजवटीविरोधात पुकारलेले बंड, १९८९च्या सुवर्ण महोत्सवी वर्षी सोशालिस्ट युनियन ऑफ यूथ या संघटनेतर्फे कम्युनिस्ट झेक सरकारविरुद्ध छेडलेले आंदोलन या घटनांचा समावेश आहे, तसेच बर्लिनची भिंत पाडल्यानंतरही इंटरनॅशनल युनियन ऑफ स्टुडंटतर्फे या दिवशी आनंद साजरा करण्यात आला होता. नोव्हेंबर २००४मध्ये मुंबईत वर्ल्ड सोशल फोरममध्ये जगभरातील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या हक्कांविषयी कार्यक्रम केला होता.

यंदाही हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर पाळला जातो. या दिवशी सामाजिक उपक्रम राबवून या लढ्यांमधून बलिदान दिलेल्या विद्यार्थ्यांचे स्मरण केले जाते. एका अर्थी हा दिवस हुतात्मा आदरांजली दिन म्हणून पाळला जातो.

देशाच्या धामिर्क, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीत बदल घडवून आणण्याची ताकद विद्यार्थ्यांमध्ये असते. ही त्यांची क्षमता ओळखूनच युरोपियन युनियन विश्व विद्यार्थी दिनाच्या सोहळ्यात सहभागी होते. इथल्या विद्यार्थ्यांनी कोलम्बिया, इराण, झिम्बाब्वे यांसारख्या देशांत होणाऱ्या दडपशाहीविरुद्ध आवाज उठवला आहे. 'शिक्षण ही मुठभरांचीच मक्तेदारी नको, शिक्षण सर्वांसाठी' हा त्यांचा आग्रह आहे. समाज घडवण्यात तरुण विद्यार्थी नेहमीच आघाडीवर असतात, त्यांचा उच्चरवातील आवाज राज्यकर्त्यांना असह्य होतो आणि अखेर नमते घेतात.

**क्लिक...क्लिक...!**



**उरण : तापमानाचा पारा घसरत असल्याने पहाटेच्या वेळी धुके पडू लागले आहे. या धुक्यातून वाट काढत पुढे जाणारे वाहनचालक.**

## आरोग्य प्रहर

# अनेक आजारांवर कडीपत्त्याचा चहा गुणकारी

कढीपत्त्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, लोह, फॉस्फरस, कॅल्शियम, अशा प्रकारची पोषक घटक असतात.



कडीपत्ता, तुळस या वनस्पतींना औषधी वनस्पती मानले जाते. या वनस्पतींचा वापर अनेक ठिकाणी केला जातो. कढीपत्ता सर्वात जास्त वापर हा जेवणासाठी केला जात असला तरी तो आरोग्यासाठी खूप गुणकारी आहे. शिवाय कढीपत्त्याचा चहादेखील बनवला जातो आणि तो आरोग्यासाठी उपयुक्त असतो. त्यामुळे हा चहा कसा बनवतात आणि त्याचे फायदे काय आहेत हे जाणून घेऊयात...

**मधुमेहाचा त्रास असणाऱ्यांसाठी फायदेशीर** : अनेक लोक मधुमेहाच्या समस्येने त्रस्त असतात. हे लोक चहा प्यायल्यानेदेखील साखर नियंत्रणात ठेवू शकतात. जर तुम्ही कढीपत्त्याच्या पानांचा चहा प्यायलात तर हा चहा रक्तातील साखरेची पातळी वाढवत नाही.

**त्वचेसाठीही लाभकारी** : कढीपत्ता आपल्या त्वचेसाठीही उपयुक्त आहे. त्याचा वापर केल्याने त्वचा तेजस्वी होते. सोबतच मुरुमांचा त्रास देखील दूर होतो. कढीपत्त्याच्या पानांमध्ये उच्च पातळीचे फिनॉलिक्ससह अँटिऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे मुक्त रॅडिकल्समुळे त्वचेचे संरक्षण करण्यासाठी उपयुक्त असतात.

कढीपत्त्याच्या चहाचे सेवन हे गरोदरपणातही केले जाऊ शकते. हा चहा प्यायल्याने तुम्हाला होणारा उलट्या, मळमळ, मॉर्निंग सिकनेस यांसारख्या समस्यांचा त्रास जाणवणार नाही. शिवाय हा चहा प्रवासापूर्वी आणि प्रवासादरम्यान प्यायला तरी प्रवासात थकवा येणार नाही आणि उलट्यांचा त्रासदेखील होणार नाही. कढीपत्त्याचा सुगंध हा मज्जातंतूंना आराम देण्यास मदत करू शकतो.

**असा बनवा चहा** : चहा बनवण्यासाठी २० ते २५ ताजी कढीपत्त्याची पाने घ्या, ती पाण्याने स्वच्छ धुवा. त्यानंतर चहाच्या भांड्यात एक कप पाणी घाला आणि ते पाणी गॅसवर उकळवा. पाणी उकळल्यानंतर त्यामध्ये कढीपत्ता पाने टाका आणि ती थोडा वेळ झाकून ठेवा. तुम्हाला चहात गोडवा हवाच असल्यास थोडासा गूळ वापरा पण साखरेचा वापर टाळा. काही वेळ चहा गॅसवर उकळा त्यानंतर पाण्याचा रंग बदलेल आणि मग तुम्ही आरोग्यदायी असा चहा प्या आणि निरोगी रहा.


# नेरळमधील अनधिकृत प्लास्टिक आच्छादने हटविली

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बांधलेल्या नेरळ बाजारपेठेमधील कॉंक्रीटच्या रस्त्याच्या फुटपाथवर प्लास्टिक आच्छादने टाकून टपऱ्या उभारण्यात आल्या आहेत. नेरळ ग्रामपंचायतीने बुधवारी (दि. १६)कारवाई करीत या टपऱ्यांवरील प्लास्टिक आच्छादने काढून टाकली. त्याचवेळी फुटपाथवर पथारी मांडून व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा नेरळ ग्रामपंचायतने दिला आहे.

फुटपाथवरील अतिक्रमणाबद्दल नेरळ ग्रामपंचायतीवर स्थानिकांकडून ताशेरे ओढले जात आहेत. फुटपाथ हे पादचाऱ्यांना चालण्यासाठी असताना त्या ठिकाणी प्लास्टिक आच्छादने टाकून टपऱ्या उभारण्यात आल्या आहेत. ही प्लास्टिक आच्छादने आणि टपऱ्यांबद्दल स्थानिकांकडून सतत येणाऱ्या तक्रारी लक्षात घेऊन, नेरळ ग्रामपंचायतीने, प्लास्टिक आच्छादने, टपऱ्या आणि अन्य सर्व साहित्य काढून टाकावे, अशी नोटीस टपरीधारकांना दिली होती. मात्र टपरीधारकांनी त्याकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळे ग्रामपंचायतीने बुधवारी कारवाई करुन टपऱ्यांवरील प्लास्टिक आछादने काढून टाकली आली.

फुटपाथवर केवळ टोपलीमधून व्यवसाय करण्याचा तात्पुरता परवाना देण्यात आला असताना, पक्के बांधकाम आणि आच्छादने टाकून उभ्या राहिलेल्या टपऱ्यांवर कारवाई केल्याने नेरळ ग्रामपंचायतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# माणगाव पोलीस ठाण्यात सॅनिटरी नॅपकिन मशीन




**माणगांव : प्रतिनिधी**

ह्युमॅनिटी युनायटेड फेडरेशन आणि माणगाव पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. १६) येथील पोलीस ठाण्यात मासिक पाळीच्या स्वच्छता मुद्यावर मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी पोलीस ठाण्यात बसविण्यात आलेल्या सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीनचे उद्घाटन करण्यात आले.

मासिक पाळी संदर्भात नेहमीच लाज, संकोच बाळगल्याने महिला व युवतींना अनेक गंभीर आजारांना आणि इतर समस्यांना तोंड द्यावे लागते. मासिक पाळीतील मनातील लज्ञा, संकोचची जागा गर्व आणि आनंदात बदलण्यासाठी ह्युमॅनिटी युनायटेड फेडरेशनद्वारा अभियान सुरू केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून माणगाव पोलीस ठाण्यात बुधवारी मासिक पाळीच्या स्वच्छता मुद्यावर मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी पोलीस ठाण्यात बसविण्यात आलेल्या सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीनचे उद्घाटन करण्यात आले. पाच रुपयाचा शिक्का टाकल्यानंतर या मशीनमधून सॅनिटरी नॅपकिन बाहेर येते. या सेवेचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन या वेळी माणगाव पोलिसांतर्फे करण्यात आले.

महिला दक्षता समिती सदस्या तुलसा पवार, किशोरी हिरवे, डॉ. साकोलेकर, पोलीस उपनिरीक्षक अस्मिता पाटील, ह्युमॅनिटी फेडरेशन संस्थापक प्रशांत जोशी, कोकण विभाग अध्यक्ष सचिन शिंदे, पोलीस शिपाई रामनाथ डोईफोडे, शाम शिंदे यांच्यासह विद्यार्थीनी या वेळी उपस्थित होत्या. उपस्थित महिलांना सॅनिटरी नॅपकिन्सचे मोफत वाटप करण्यात आले.

# मुरूडच्या डकलिंग इंटरनॅशनल स्कूलमध्ये बाल दिन उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

येथील डकलिंग इंटरनॅशनल स्कूलमध्ये सोमवारी (दि. १४) बाल दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व शाळेची प्रार्थना घेऊन करण्यात आली.

पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस बाल दिन म्हणून साजरा केला जातो, असे सांगून शाळेचे अध्यक्ष दीलावर महाडकर यांनी विद्यार्थ्यांना बाल दिनाचे महत्त्व सांगितले. मुख्याध्यापक सुशीलकुमार शिंदे, संचालक श्रद्धा लाड यांनीही मनोगत व्यक्त केले.



बाल दिनाच्या निमित्ताने शिक्षकांनी बनविलेले आयमास्क विद्यार्थ्यांना देण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांचे संगीत खुर्ची, नृत्य इत्यादी खेळ घेण्यात आले. दुकानदार असोसिएशनचे अध्यक्ष जाहिद फकजी यांनी विशेष मार्गदर्शन करून सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटप केले.

# रायगड जिल्ह्यात सागरी कवच अभियान





**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलातर्फे १५ व १६ नोव्हेंबर या कालावधीत जिल्ह्याला सागरी कवच अभियान राबविण्यात आले. या अभियानात भारतीय नौदल, भारतीय तटरक्षक दल, पोलीस विभाग, भारतीय सीमा शुल्क विभाग, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मत्स्य व्यवसाय विभाग इत्यादी विभागातील अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते.

रायगड जिल्ह्याला १२२ किमी समुद्र किनारा लाभलेला असून सागरी किनारा सुरक्षितता अधिक बळकट करण्याच्या दृष्टीकोणातून अतिरेकी कारवाई/दहशतवादी हल्ले रोखण्याकरीता सर्व सागरी विभागांची सतर्कता पडताळून पाहण्याकरिता सागरी कवच अभियान अभियान राबविण्यात आले.

सदर अभियानाकरीता रायगड पोलीस दलाचे ८६ अधिकारी व ५०७ पोलीस अंमलदार तसेच नौका विभागाकडील आठ तांत्रिक अधिकारी, १९ अंमलदार व १८१ सागर रक्षक दल सदस्य नेमण्यात आले होते.

रायगड पोलीस दलाने चेकपोस्ट, नाकाबंदी, लॅडींग पॉईट, महत्वाची पर्यटन स्थळे, मर्मस्थळे, फिंशीग लॅडींग पॉईट, बेटे, निर्जन ठिकाणे, मंदिरे इत्यादी ठिकाणी योग्य तो बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे. रायगड पोलीस दलाकडील सहा स्पीड बोटीद्वारे व चार अधिग्रहीत खाजगी ट्रॉलर्सद्वारे सागरी भागात सतर्क पेट्रोलिंग करण्यात आले.

# शेतकऱ्यांनी गिरविले बीजप्रक्रियेचे धडे

**कर्जत : प्रतिनिधी**

युनायटेड वे-मुंबई जल संजीवनी प्रकल्प कर्जत अंतर्गत तालुक्यातील वारे ग्रामपंचायत हद्दीतील कुरुंग गावात तसेच अंभेरपाडा ग्रामपंचायत कार्यालयात शेतकऱ्यांसाठी बीजप्रक्रिया करण्याचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. या वेळी शेतकऱ्यांनी बीजप्रक्रियेचे धडे गिरविले.




समूह संघटक विवेक कोळी यांनी शेतकऱ्यांना बीजप्रक्रिया उपक्रमाची पार्श्वभूमी सांगितली आणि कृषि तज्ज्ञ जोएब दाऊदी यांनी बीज प्रक्रियेचे महत्त्व सांगून ऋखठ (र्ऱीपसळलळवश, खपीशलींळलळवश, ठहळ्ूलर्ळीा ) क्रम अर्थातच आधी बुरशीनाशकाची प्रक्रिया त्यानंतर कीडनाशक आणि सगळ्यात शेवटी रायझोबियम कल्चर उपचार करीत प्रात्यक्षिक सादर केले.

बीजप्रक्रिया करतांना सर्वप्रथम आपल्या आरोग्याला प्राधान्य द्यावे. रासायनिक किंवा जैविक साहित्यांच्या सरळ संपर्क आपल्या शरीराशी टाळावा. रसायनाचे वास घेणे, हाताने ढवळणे इ. करू नये. मास्क आणि हातमोजे यांचा वापर अनिवार्य करावा. प्रक्रिया केलेले बियाणे फक्त आणि फक्त पेरणीसाठी असून लहान मुल, जनावर इ.पासून दूर ठेवावे आणि जास्त काळ तसेच न ठेवता त्वरित सावलीत सुकवून पेरून द्यावे, अशा महत्त्वाच्या सूचना त्यांनी या वेळी केल्या.

युनायटेड वे मुंबई जल संजीवनी प्रकल्प कर्जतचे व्यवस्थापक प्रदिप क्षीरसागर, उपव्यवस्थापक मुक्ताजी कांबळे, शेतकरी तुकाराम गणपत तिटकारे, केशव कृष्णा धादवड, बळीराम महादू लांघी, रामचंद्र बाबू सुपे, पांडुरंग बाबू लांघी, मारुती पांडू असवले, उमाजी राघव बांबळे, ग्रामसेवक महेन्द्र कुंटे, अंभेरपाडा प्राथमिक शाळेचे शिक्षक तानाजी गव्हारी, कुरुंग ग्रामस्थ कांचन भोईर, ज्योती कोशिंबे, सोनी भोईर, राही भोईर, भाऊ कोशिंबे, अशोक भोईर, लक्ष्मण भोईर, चंद्रकांत भालेराव, राकेश पाटील, गजानन भोईर, मदन भालेराव, दीपक भोईर, महेश भोईर या वेळी उपस्थित होते. युनायटेड वे मुंबई - जलसंजीवनी प्रकल्प कर्जतचे कार्यक्षेत्र अधिकारी संतोष काठे, कुंडलिक पादीर आणि अमर पारधी यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.


**ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय कसलखंड**
**ता. पनवेल, जिल्हा. रायगड**
**जाहीर निविदा**
इ मेल - gpkasalkhand1956@gmail.com

आपणास कळविण्यात येते की, खालील प्रमाणे कामांसाठी सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचेकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत ठेकेदाराने दिनांक १७/११/२०२२ ते २३/११/२०२२ रोजी दुपा. २.०० वा. पर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा २४/११/२०२२ रोजी दुपारी ०१.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी उपस्थित रहावे कोणतीही एक अगर सर्वच निविदा मंजूर अथवा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा इसारा १% | सुरक्षा अनामत ५% | निविदा किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १) | मौजे आष्टे येथील तलावास अजिवली भातान रस्त्यास लागून तलावालगत संरक्षण भिंत बांधणे. | २,९८,९३३/- | २९८९/- | १४९४७/- | २३६ |
| २) | मौजे आष्टे ताव संरक्षण भिंत बांधणे. | ४,८२,३७४/- | ४८२३/- | २४११९/- | ५९० |
| ३) | मौजे अरिवली येथील शिवाजी पुतळा ते अंगणवाडी पर्यंत RCC पीप गटार बांधणे. | ३,६७,९८३/- | ३६७९/- | १८३९९/- | ५९० |
| ४) | मौजे अरिवली गणेश विसर्जन घाट दुरुस्ती | २,१६,०५२/- | २१६०/- | १०८०३/- | २३६ |
| ५) | वाडाचे झाड सुशोभीकरण करणे. | ५६,५९२/- | ५६५/- | २८३०/- | २३६ |
| ६) | शिवाजी पुतळा ते मोरी पर्यंत RCC गटार | ४,२९,३७१/- | ४२९३/- | २१४६९/- | ५९० |
| ७) | कृष्णा मारुती पाटील यांचा घराकडे जाणारा रस्ता कॉंक्रीटीकारण करणे. | १,१४,२९४/- | ११४२/- | ५७१५/- | २३६ |
| ८) | कसळखंड गावामध्ये येणारा मुख्य रस्ता दुरुस्त करणे. | १,६४,२९८/- | १६४२/- | ८२१५/- | २३६ |
| ९) | शिवाजीनगर अंगणवाडी दुरुस्ती करणे. | १,११,८८०/- | १११८/- | ५५९४/- | २३६ |
| १०) | शिवाजीनगर शाळा दुरुस्ती करणे. | १,८१,४३२/- | १८१४/- | ९०७२/- | २३६ |
| ११) | धरमदास माळी ते पाण्याची टाकी RCC गटार बांधणे. | ३,२३,२६०/- | ३२३२/- | १६१६३/- | ५९० |

**टीप :-**
१. कामाचे अंदाजपत्रक व नकाशा दि. १७/११/२०२२ ते २३/११/२०२२ रोजी दुपारी १ ते २ वाजेपर्यंत कार्यालयात पहायला मिळतील.
२. कामे व त्यांची बिले उपलब्ध निधी नुसार दिली जातील.
निविदेंच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे :-
१. सदर सर्व निवडींची प्रक्रिया ग्रामपंचायत मार्फत केली जातील.सदर निविदा नोटीस,सूचना, सुधीपत्रक,इत्यादी माहिती ग्रामपंचायत नोटीस बोर्ड वर उपलब्ध आहे.
२. निविदे सोबत ग्रामपंचायत कसळखंड या नावाने १% रकमेचा डी डी किंवा बँक खाते क्र. 020010100025775 वर भरून त्यांची सामान्य पावती जोडणे आवश्यक आहे.
३. कोणतेही कारण न दाखविता निविदा नाकारण्याचे व स्विकारण्याचे अधिकार प्रसिद्धी धारकाने राखून ठेवला आहे.
४. काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल.
**५. सदर कामातून ५% सुरक्षा अनामत रक्कम बिलातून परसपर कपात केली जाईल.**
६. पॅन कार्ड,GST ची प्रत ग्रा.पं. कडे सादर करावी.
७. income Tax प्रतावाची प्रत ग्रा.प. कडे सादर करावी.
८. १०० रु बॉडपेपरवर प्रतिज्ञा पत्र ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावी
९. कमीत कमी विविध दर सादर करणाऱ्या कामगारास कामे देण्याचा विचार केला जाईल.
१०. तालुक्यातील व नोंदणीकृत स्थानिक ठेकेदारास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. वरील सर्व अटी शर्ती या विकास कामासाठी आहेत. (लायसन्स द्वारे करावयाच्या कामाची मर्यादा ओलांडली नसल्याबाबत दाखले.)
११. कामाच्या साहित्याचे नमुने प्रयोग शाळेतून तपासून घ्यावेत. व त्यांच्या अहवालाची प्रत ग्रामपंचायतीस सादर करावी.

दि. १६/११/२०२२

**सही/-**
**सौ. माधुरी अनिल पाटील**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत कसळखंड**
**ता. पनवेल, जि. रायगड**



महावितरण

## ई-निविदा सुचना

**खालील नमूद केलेल्या कामासाठी अनुभवी सरकारी / निमसरकारी खात्यात आणि महावितरण कंपनित नोंदणीकृत असलेल्या ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत.**

| ई-निविदा क्रमांक : | कामाचे नाव | कालमर्यादा | अंदाज पत्रक रक्कम | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|
| टी-६६/ २०२२-२३ | पेण जिल्हा रायगड येथे स्टाफ क्वार्टर्स/कॉलनीज परिसराची दैनंदिन देखभालीची कामे करणे. | १२ महिने | ४,८४,७५१.०० | ४९००.०० |

ई-निविदा सुचना आणि वरील कामासंबंधीची कागदपत्रे आमच्या संकेतस्थळ www.mahadiscom.in वर उपलब्ध आहेत. कोऱ्या निविदेची रक्कम ऑनलाईन भरावी तसेच इसारा रक्कम रोखीने अथवा ऑनलाईन निविदा अपलोड करण्याच्या दिवशी अथवा पूर्वी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, दुसरा मजला, विद्युत बिल्डींग, एल.बी.एस. मार्ग भांडुप (प) येथे भरावी. तसेच इसारा रक्कम म.रा.वि.वि. कंपनीच्या नियमाप्रमाणे फक्त कार्यालयीन वेळेत ई निविदेमध्ये नमुद केलेल्या कालावधीमध्ये मंजुर करण्यात येईल. निविदा विक्रीचा कालावधी दि. **१७.११.२०२२ ते २४.११.२०२२** पर्यंत व ई-निविदा ऑनलाईन अपलोड करण्याचा कालावधी दिनांक **२५.११.२०२२** रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत आहे. शक्य असल्यास सादर केलेल्या ई-निविदा दि. **२५.११.२०२२** रोजी दुपारी ०३.०० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत.

**कार्यकारी अभियंता (स्था) भांडुप**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. जनार्दन शंकर पाटील** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - वारदोली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| गट नं. / हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १३९/१ | ०-१७-९०<br>पो.ख. ०-०२-८०<br>**एकूण ०-२०-७०** | ३.३१ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १७/११/२०२२.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट
वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. : ९९३०३६९८६१



**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**
नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :- coud.kulgsonbsdslspur@maharashtra.gov.in
वेबसाईट :- http://kbmc.gov.in

जा.क्र. : कुबनप/साबां/६६३/२०२२-२३ दिनांक :- १६/११/२०२२

**जाहीर निविदा सूचना क्र. ८७/२०२२-२३**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत विविध ०४ कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडन टक्केवारी दराच्या निविदा मागविण्यात येत आहे.

सदर निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. १७/११/२०२२ ते दि २५/११/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे.व सदर निविदा शक्य झाल्यास दि. २८/११/२०२२ रोजी दुपारी ४.०० नंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतच्या सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या सूचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**(योगेश गोडसे)**
मुख्याधिकारी तथा
प्रशासक कुळगांव बदलापूर नगरपरिषद



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM RE-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:** EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/Tech/ Tender No.- 46/2022-23 Dt. 17.11.2022 **RFx No.7000025207** | **Sub:** Invitation of SRM RE-Tender for anti-corrosive coating painting with chemical resistance of 25 MVA TF-2, 100 MVA ICT-2 at 220/100/22 kV Kandalgaon S/s, 25 MVA T/F-I & 25 MVA T/F-II & Gantry column/ Beam structure at 100/22 kV Mhasala S/s and 25 MVA TF-1, at 220/22 kV Vile Bhagad S/s under EHV O&M Division, Mahad | Up to Rs. 24,95,301/- (Including GST+ 1% Labour Cess) |

**EMD** will be 1% of the Estimated Cost or Rs. 5,000/- whichever is the highest & **Tender Fee** will be Rs. 500/-plus GST+1% Labour Cess.

**Bid Submission:** From 17.11.2022 @ 00:00 Hrs to 23.11.2022 @ 23:59 Hrs for above Tender. For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV(O&M) Dn., Mahad**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## RE-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

**Tender No.: EE/400kV/RS(O&M)/ DN/KHR/Re-Ten-6/22-23 (RFx No. 7000025021)**

**Period for Submission of E-Bid:** 16.11.2022 to 23.11.2022 up to 23:59 Hrs

**Name of Work:** Replacement of existing damaged 400kV 0.5 ACSR Quadruple Bus Conductor Span at 400kV R.S., Kharghar

| Estimated Cost (Rs.) | EMD (Rs.) | Tender Fee (Rs.) | Closing Date | Technical Opening Date | Commercial Opening Date |
|---|---|---|---|---|---|
| 14,30,827.87/- (Including GST) | 14,308.28/- | 500/- + GST | 23.11.2022 up to 23:59 Hrs | 24.11.2022 at 10:00 Hrs (If possible) | 24.11.2022 at 10:15 Hrs (If possible) |

**Contact Persons:** 1) Mr. S. J. Darekar, Executive Engineer-Charge, 400kV R.S. O&M Dn., Kharghar, 9619892040 2) Ms. P. C. Deshpande, Dy. EE (O), 400kV R.S. O&M Dn., Kharghar, 9819313988

For further details, visit our website **www.mahatransco.in**

1] Tender documents can be downloaded by only online from aforesaid website.

2] Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date.

MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.

**Note :** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender (New) portal: **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E-TENDER NOTICE (EXTENSION)

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/Tender No.43/ 2022-23 Dt. 02.11.2022 **RFx No. 7000025100** | **Sub: Extension** for SRM E-Tender for Supply of Ladder & Mats at various Substations & KTL S/Dn., Mahad under EHV (O&M) Division, Mahad. | Up to Rs. 4,94,444/- (Including GST) |

**EMD** will be 1% of the Estimated Cost or Rs. 5,000/- whichever is the highest & **Tender Fee** will be Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess.

**Bid Submission:** From 17.11.2022 @ 00:00 Hrs to 23.11.2022 @ 23:59 Hrs for above tender.

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV(O&M) Dn., Mahad**

# एकसंध शक्तीने प्रश्न सोडविता येतात

## माथाडी कामगार नेते नरेंद्र पाटील यांचे प्रतिपादन

**नवी मुंबई : बातमीदार**

कष्टकरी माथाडी कामगारांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी व्यापार आणि काम वाढले पाहिजे. त्यासाठी व्यापारी, बाजार समिती, कामगार व अन्य घटकांनी एकसंघ राहणे गरजेचे आहे. आपल्या एकसंध शक्तीने शासनाकडून आपले प्रश्न सोडविता येतील, असे उद्गार महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे नेते माजी आमदार व शासनाच्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष (मंत्री दर्जा) नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी काढले.

नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांची शासनाच्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष (मंत्री दर्जा)पदी निवड झाल्याबद्दल नवी मुंबईतील एपीएमसी मसाला मार्केटमधील तमाम माथाडी कामगार, वारणार, व्यापारी, पालावाला महिला कामगार व अन्य घटकांच्या वतीने सत्कार आयोजित करण्यात आला होता, त्या वेळी नरेंद्र पाटील बोलत होते.



माथाडी कामगार नेते नरेंद्र अण्णासाहेब पाटील पुढे म्हणाले की, एपीएमसी मार्केट आवार व इतर ठिकाणी कामे कमी झाल्यामुळे माथाडी कामगार व त्यांच्या कुटुंबीयातील सदस्य व्यवसाय करीत आहेत, अशा लघु उद्योगाला अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत कर्ज मिळण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल. कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांनी स्थापन केलेली ऐतिहासिक माथाडी कामगार केंद्रबिंदू मानून माथाडी कामगार व मराठा समाजासाठी कार्य करीत राहणार आहे.

कार्यक्रमात मसाला मार्केटमधील धडाडीचे कार्यकर्ते जितेंद्र येवले यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक भाषण केले. या वेळी व्यापारी असोसिएशन पदाधिकारी व बाजार समितीचे माजी संचालक मोहन गुरनानी, किर्ती राणा तसेच मसाला मार्केट कार्यकर्ते सर्वश्री दिनकर सनुगले, शंकर चोरगे, संतोष अहिरे, श्रीमंत शिंदे, सखाराम शेलार, संभाजी पाटील आदींची भाषणे झाली, दिनकर सनुगले यांच्यासह कार्यकर्त्यांनी नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांच्या कार्याची माहिती देत मार्केट आवारातील कामगारांचे प्रश्न मांडले. सत्कार समारंभाचे सूत्रसंचालक युनियनचे जनसंपर्क अधिकारी पोपटराव देशमुख व सेक्रेटरी अशोक दुधाणे यांनी केले.

या सत्कार समारंभास महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे अध्यक्ष एकनाथ जाधव, संयुक्त सरचिटणीस चंद्रकांत पाटील, रविकांत पाटील, ऋषिकांत शिंदे, उपाध्यक्ष सुर्यकांत पाटील, कायदेशीर सल्लागार ॲड. भारती पाटील, व्यापारी प्रतिनिधी मोहन गुरनानी, किर्ती राणा व मसाला मार्केटमधील विविध असोसिएशन व फामचे पदाधिकारी सर्वश्री अशोक जैन, दीपक शहा, अमरीश बारोट, प्रदीप गाला, मनीलाल, चंदू पटेल, शाम मेहता, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे मसाला मार्केट आवारात कार्यरत असलेले अधिकारी सर्वश्री मेश्रामसाहेब, देशमुखसाहेब तसेच दाणाबंदर मार्केट, कांदा-बटाटा मार्केट, भाजीपाला व फळे मार्केटमधील कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

### एपीएमसी मार्केटमध्ये भव्य सत्कार

मसाला मार्केटच्या जावक गेटवरून नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांना मार्केटमधील सर्व घटकांनी मिरवणुकीने कार्यकमस्थळी आणले. तेथे त्यांचा वेलची आणि ड्रायफ्रुटचा हार, गदा, शाल, श्रीफळ देऊन भव्य सत्कार करण्यात आला.

# पनवेल शहर पोलीस ठाण्याची लोक अदालतमध्ये हॅट्ट्रिक

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ २मध्ये लोक अदालतदरम्यान सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांक पनवेल शहर पोलीस ठाणे यांनी पटकावले आहे.

पनवेल शहर पोलीस ठाणे येथे कार्यरत असणारे समन्स व वॉरंट विभागाचे अंमलदार पोलीस हवालदार युवराज येळे, पोलीस हवालदार रजनीकांत पगारे, पोलीस नाईक नितीन कुंभार, पोलीस नाईक नंदकुमार आढारी यांनी आतापर्यंत विविध गुन्ह्यासंदर्भात बजावलेल्या समन्स व वारंट यातून केलेल्या कामाचे कौतुक वरिष्ठ पातळीपर्यंत करण्यात आले आहे.

या कर्मचाऱ्यांचा नुकताच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी सन्मानचिन्ह देऊन गौरव केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# रेल्वे स्टेशन परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** रेल्वे स्टेशन परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याचा नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत.

मयत व्यक्तीचे अंदाजे वय ३५ वर्षे, उंची पाच फूट पाच इंच, अंगाने मध्यम, उजव्या हातावर R V Gohil असे इंग्रजीमध्ये गोंदलेले आहे. अंगात निळा शर्ट व पँट आहे. या व्यक्तीबाबत माहिती असल्यास रेल्वे पोलीस ठाणे (०२२-२७४६७१२२) किंवा पोलीस उपनिरीक्षक डी. एस. बदाले (९५९४९१२२९४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शाहू महाराज विद्यालयात बिरसा मुंडा जयंती

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका संचलित राजश्री छत्रपती शाहू महाराज विद्यालय डॉ. आंबेडकर नगर रवाळे नवी मुंबई येथे मंगळवारी (दि. १५) भगवान बिरसा मुंडा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



सुरुवातीला बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन माजी महापौर सुधाकर सोनवणे, मुख्याध्यापक अमोल खरसंबळे व सर्व शिक्षक वृंद यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी शिक्षक दिलीप निंबाळा व मेथाजी देसाई यांनी मराठी व हिंदीमधून बिरसा मुंडा यांनी केलेल्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कारंडे व अमोलकुमार वाघमारे यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक विनोद झापडे यांनी केले. आभार राजू राठोड यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन शाळेतील शिक्षक रामराव कंदगुळे, सदानंद वाघमारे, जया नगराळे, राजश्री उमराणीकर, शिल्पा टिकले यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी पालक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नवी मुंबई : भारतीय स्वातंत्र्यलढ्यामधील आदिवासी समाजातील जननायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीदिनी महापालिका मुख्यालयात प्रतिमापूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या वेळी प्रशासन विभागाचे उपआयुक्त नितीन नार्वेकर, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, माजी नगरसेवक रमेश डोळे, राजश्री कातकरी, जयश्री ठाकूर आदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**

# फुंडे हायस्कूलमध्ये बाल दिन साजरा

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर माध्यमिक विद्यालय येथे सोमवारी (दि. १४) पंडित जवाहरलाल नेहरू जयंती आणि बाल दिन साजरा करण्यात आला. इयत्ता सातवी 'क'च्या वर्गाने हा कार्यक्रम अतिशय उत्कृष्टरित्या साजरा केला.

विद्यालयाच्या प्राचार्या एस. जी. वर्तक, ज्येष्ठ विज्ञान शिक्षक एस. डी. म्हात्रे, सातवी 'क'च्या वर्गशिक्षिका एस. एम. भोईर यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यालयाच्या प्राचार्या वर्तक यांनी वाढदिवस असणाऱ्या विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच सर्व विद्यार्थ्यांना बाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या वेळी मानसी मोहिते, आकांक्षा केंद्रे, अमृता जाधव, अक्षरा मोटे, श्रेया निळकंठ, स्नेहा खडतरे, साक्षी घेरडे, पंखुडी मौर्य या विद्यार्थिनींनी आपल्या भाषणातून पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्याची माहिती सांगत बाल दिनाचे महत्त्व सांगितले. इयत्ता सातवी 'क'मधील वैष्णवी निळकंठ हिने या सुंदर कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन केले.



# उरणच्या द्रोणागिरी विद्यालयात बाल दिनानिमित्त विविध स्पर्धा



**उरण : वार्ताहर**

द्रोणागिरी हायस्कूल इंग्रजी माध्यम करंजा द्रोणागिरी विद्यालयात सोमवारी (दि.१४) विद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयात या दिनानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा तसेच ज्युनिअर के. जी. ते इयत्ता चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमास करंजा मच्छीमार सोसायटीचे चेअरमन भालचंद्र शांताराम कोळी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सुरवातीस विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रभू यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. सोनाली मॅडम यांनी प्रभू यांचे स्वागत केले.

भालचंद्र कोळी यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन केले. त्यानंतर इयत्ता सातवी आणि आठवीच्या मुलींचे स्वागत गीत आणि ईशस्तवन झाले. या कार्यक्रमास विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

बाल दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनाबद्दल माहिती आपल्या भाषणातून सांगितली. विद्यालयातील आयोजित स्पर्धेत बरेच विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तू बक्षीस म्हणून देण्यात आल्या तसेच विद्यार्थ्यांना प्रशिस्तपत्रके देण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी शिक्षकांनी चांगले सहकार्य केले.

# लिमये वाचनालयातर्फे बाल दिन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालयाने या वर्षी एका अभिनव पद्धतीने हुतात्मा हिरवे गुरुजी शाळेत बाल दिन साजरा केला. संस्थेच्या अध्यक्ष ॲड. सुनिता जोशी, कार्याध्यक्ष विनायक वत्सराज, मुख्याध्यापक सुजित म्हात्रे, शिक्षक वृंद आणि मुलांनी जय्यत तयारी केली होती.

समूह गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. सुजित म्हात्रे यांनी बाल दिनाचे महत्त्व विशद केले. संस्थेचे कार्यवाह काशिनाथ जाधव यांनी पंडित नेहरू यांच्या जीवनातील विचार मांडले. छोट्या मुलांनी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतून बहारदार भाषणे केली.

चाचा नेहरूंच्या जीवनावर आधारित प्रश्नोत्तरे झाली. वाचनालयाच्या अध्यक्ष ॲड. सुनिता जोशी यांनी मुलांना विविध प्रश्न विचारले. या कार्यक्रमाला संस्थेचे सहकार्यवाह जयश्री शेटे, हिमालनी कुलकर्णी, रमेश चव्हाण, संस्थेच्या ग्रंथपाल निकेता शिदे, कर्मचारी संपदा जोशी आदी उपस्थित होते.

# सर्पदंश झालेल्या रुग्णाचे पनवेल उपजिल्हा रुग्णालयाने वाचवले प्राण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील नारपोली गावातील नामदेव पदु मढवी यांना सर्पदंश झाल्या नंतर, मढवी यांचा जीव पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरने वाचवला आहे. मढवी यांच्यासाठी हा चमत्कारच होता, कारण मढवी यांना सर्पदंश झाल्याचे समजल्यानंतर ते डॉक्टरकडे न जाता एका मांत्रिकाकडे उपचार घेऊन घरी बसले होते. तब्येत बिघडल्यानंतर मढवी यांनी उपजिल्हा रुग्णालयात धाव घेतली आणि त्यांचा जीव वाचला आहे. मढवी यांनी डॉक्टरांचे आभार व्यक्त केले आहे.

पनवेल तालुक्यातील नारपोली गावातील रहिवाशी नामदेव पदु मढवी यांना सर्पदंश झाला होता, नामदेव मढवी नेहमीप्रमाणे त्याच्या शेतात काम करत होते, काम करत असताना शतातील गवताचा भारा उचलण्यासाठी ते गेले असता या गवताच्या भाऱ्या खाली लपून बसलेल्या सापाने, त्यांच्या हाताला दंश केला, साप चावल्या नंतर ते घरी गेले आणि घरातील कुटूंबाच्या सल्ल्यानंतर मढवी हे त्याच्या गावाच्या परिसरात असलेल्या एका नावाजलेल्या मंत्रीकाडे गेले, हा मांत्रिक साप चावल्यानंतर, विष उतरवतो अशी माहिती मढवी कुटूंबांना काही मित्र परिवाराने दिली होती. या माहितीनुसार मढवी कुटुंब त्या मांत्रिकाकडे उपचार करण्यासाठी गेले, मांत्रिकाने उपचार करून मढवी यांना घरी जाण्याचा सल्ला देत, दवाखान्यात जाऊ नका, आराम होऊन तब्येत लगेच बरी होईल असा सल्ला दिला.

उपचार घेऊन घरी गेल्यानंतर एका तासांत मढवी यांचा हात सुजू लागला तसेच रक्तस्राव वाढला. वाढलेला रक्तस्राव पाहिल्यानंतर मढवी कुटुंबांनी काही तासानंतर त्यांना पनवेलमधील उपजिल्हा रुग्णालयात नेले तेथे उपचार घेतल्यानंतर अवघ्या काही मिनिटांत त्याची तब्येत सुधारण्यास सुरुवात झाली. काही तासांत मढवी ठणठणीत झाले. मढवी यांची तब्येत ठणठणीत झाल्यानंतर त्यांच्या कुटूंबीयांनी डॉक्टरांच्या टीमचे आभार मानले.

# सहकारी भातगिरणीत १५०० शेतकऱ्यांची नोंदणी

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल रायगड बाजारच्या समोर पनवेल तालुका सहकारी भातगिरणी येथे पनवेल तालुक्यातील शेतकरी बांधव तयार झालेले भातपीक देण्याकरिता कार्यालयात येऊन ऑनलाईन नोंदणी करीत आहेत. आतापर्यंत १५०० शेतकरी आहे. बांधवांनी नोंदणी केली असून भात उत्पादक शेतकऱ्यांची एकूण संख्या १७०० आहे. मागील वर्षीच्या भात खरेदी दरात १०० रूपये वाढ करून शासन भात खरेदी करणार असल्याने शेतकरीवर्गात समाधानाचे वातावरण आहे.

विकास प्रकल्पांच्या निमित्ताने शेतजमीन क्षेत्र कमी होत असल्याची ओरड एकीकडे असता पारंपरिक भात उत्पादक शेतकरी आपल्या उपलब्ध भातशेती क्षेत्रातून चांगल्यापैकी भातपीक घेत असल्याचे या निमित्ताने स्पष्ट झाले आहे. पनवेल तालुक्याप्रमाणेच रायगड जिल्ह्यातील उर्वरित सर्व तालुक्यांतदेखील भात खरेदी नोंदणीकरण शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी सुरू केली असून आतापर्यंत सुमारे सहा हजार शेतकऱ्यांनी जिल्ह्यात नोंदणी केली असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

# गीत गायनाने ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेची वर्षपूर्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'सूर निरागस हो' या संगीतप्रेमी समूह प्रस्तुत ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेची वर्षपूर्ती झाली. पनवेल येथील ब्रह्मचैतन्य साधना केंद्र येथे या निमित्ताने युवाशास्त्रीय गायिका स्वराली पणशीकर यांचे गायन झाले.

सुरेल स्वर आणि उत्तम सादरीकरण हे गुणवैशिष्ट्य असलेल्या स्वराली यांनी आपल्या गायनाची सुरुवात श्रीराम भजनाने करून उत्तम यमन राग सादर केला. त्यानंतर अभंग, नाट्यगीत व काही अप्रचलित गाण्यांचे सादरीकरण करून त्यांनी रसिकांची प्रशंसा प्राप्त केली. अथर्व देव यानी संवादिनी, सुहास चितळे यांनी तबला, विशाल जोगळेकर यांनी पखवाज व आदित्य उपाध्ये यांनी तालवाद्यांची साथसंगत केली. साधना केंद्रातील सदस्यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले.



# मुरूड सुपारी संघाची निवडणूक जाहीर

## ४० उमेदवारी अर्ज वैध, १० डिसेंबरला मतदान



**मुरूड : प्रतिनिधी**

वार्षिक तीन कोटीची उलाढाल असणाऱ्या मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाची पंचवार्षिक निवडणूक येत्या १० डिसेंबर रोजी होणार असून संचालकपदाच्या १७ जागांसाठी ४० उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. आज झालेल्या छाननीमध्ये ते सर्व उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. अर्ज मागे घेण्याची मुदत १ डिसेंबरपर्यंत असून त्यानंतर या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

सहकारी तत्वावर स्थापन झालेल्या मुरूड तालुका सुपारी खरेदी विक्री संघामुळे स्थानिक लोकांना मोठा रोजगार प्राप्त झाला आहे. सुपारीचे पीक घेणाऱ्या बागायतदारांना चांगला भाव मिळवून देण्याचे काम या सुपारी संघातर्फे होत असते. दर पाच वर्षांनी या संघाची निवडणूक होत असते. ज्यांची बागायत जमीन आहे, त्यांनाच या निवडणुकीत मतदान हक्क असतो. मुरूड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाचे १३०६ सभासद असून, ते विविध विभागातून १७ संचालक निवडून देतात. निवडून आलेले संचालक चेअरमनची निवड करतात.

मुरूड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाच्या पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, त्यानुसार १० डिसेंबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी सहाय्यक निंबंधक श्रीकांत पाटील यांच्याकडे आतापर्यंत ४० उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. आज झालेल्या छाननीमध्ये त्यापैकी एकही अर्ज बाद झाला नाही. १ डिसेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत असून त्यानंतर या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

# माणगावजवळ कारची रिक्षाला धडक

## चार प्रवासी जखमी



**माणगाव : प्रतिनिधी**


मुंबई-गोवा महामार्गावर माणगावपासून दोन किमी अंतरावरील खरवली फाट्याजवळ मंगळवारी (दि. १५) रात्री भरधाव कारने रिक्षेला धडक दिली. या अपघातात चारजण जखमी झाले.

आशिष शांताराम पवार (वय ३०, रा. पुनाडेवाडी ता. महाड) हे मंगळवारी (दि. १५) रात्री त्यांच्या ताब्यातील रिक्षा (एमएच-०२,इडब्लू -६१०१) चालवित महाडकडे जात होते. त्याचवेळी अनिल अनंतराव धनवट (वय ४६, रा. भांडुप-मुंबई) हे कार (एमएच-०१,बीजी-५९८९) ने मुंबई बाजूकडे जात होते. माणगावपासून दोन किमी अंतरावरील खरवली फाट्याजवळ भरधाव कारने रिक्षेला धडक दिली. या अपघातात रिक्षा चालक आशिष शांताराम पवार यांच्यासह संजय दगडू भिलारे (वय ५२), प्रदीप सदाशिव पवार (वय ५०), प्रमिला प्रदीप पवार (वय ४८, सर्व रा.पुनाडेवाडी, ता.महाड) हे चारजण जखमी झाले.

या वेळी मुंबईकडे चाललेल्या आमदार भरत गोगावले यांनी जखमींना आपल्या गाडीत घेऊन माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर जखमींना पुढील उपचारासाठी मुंबई येथे पाठविल्यानंतर आमदार गोगावले मुंबईकडे रवाना झाले. या वेळी युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, सुदर्शन कदम, नंदुराज वाढवळ, मेहुल उभारे, राहुल बक्कम, रुपेश पानावकर यांनी जखमींना सहकार्य केले. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अधिक तपास सहाय्यक निरीक्षक सतीश अस्वर हे करीत आहेत.

# मोबाइल चार्जिंगसाठी उतरला आणि ४० फूट चेंबरमध्ये कोसळला

## बोरघाटात ट्रकचालकाचा वाचविण्यात यश



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर खंडाळा घाटात चाळीस फुटावरून खाली चेंबरमध्ये पडूनही चालकाचा जीव वाचण्याची घटना घडल्याने, देव तारी त्याला कोण मारी अशा प्रतिक्रिया उमटल्या. जखमी चालकास प्रथम नगर परिषद रुग्णालयात प्रथमोपचार केल्यानंतर त्यास मुंबईतील जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या आयशर टेम्पोचा चालक विकास राऊत (वय २८, रा. डोंबिवली) खंडाळा घाटात डिझेल संपल्याने मंगळवारी (दि.१५) रात्री ७.३० ते ८ या वेळेत आपल्या मालकाशी संपर्क करीत असतानाच त्याच्या मोबाइल फोनची बॅटरी संपली. तो बॅटरी चार्जिंग करण्यासाठी पुणे लेनवर उभ्या असलेल्या ट्रककडे जात असताना रस्त्याच्या मधोमध असलेल्या चेंबरमध्ये ४० फूट खाली कोसळला. हा प्रकार त्याच्या ओरडण्याने पुणे लेनवर उभ्या असलेल्या ट्रकच्या चालकाच्या लक्षात आल्याने, त्यांनी समयसूचकता दाखवीत पोलीस हेल्पलाइनवर फोन केला आणि लागलीच सर्व मदत यंत्रणा सतर्क झाल्या. महामार्गावरील आयआरबी पेट्रोलिंग, लोकमान्य हॉस्पिटल, खोपोली पोलीस व अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजीक संस्थेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. या यंत्रणांनी दोरखंडाने बांधलेले स्ट्रेचर खाली सोडून चेंबरमधून चालकास वर काढले. या दुर्घटनेत चालक विकास राऊत यांच्या हातापायास तसेच कमरेस गंभीर दुखापती झाल्यामुळे त्यांच्यावर खोपोली नगर परिषद रुग्णालयात प्रथमोपचार करून त्यांना मुंबईतील जे. जे. रुग्णालयात हलविण्यात आले.

## माणगाव कृषी विभागातर्फे शेतकरी प्रक्षेत्र प्रशिक्षण व भेट

**अलिबाग : जिमाका**

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत माणगाव कृषी विभागामार्फत शेतकरी प्रक्षेत्र प्रशिक्षण व भेट या पाच दिवसांच्या कार्यमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणास तळेगाव दाभाडे येथील फुलशेती, कांदा व लसूण संशोधन केंद्र-राजगुरुनगर, महात्मा फुले कृषी विद्यापीठ-राहुरी, कृषी संशोधन केंद्र-बाभळेश्वर, कृषीथॉन शेतकरी प्रदर्शन-नाशिक, कृषी प्रक्रिया उद्योग व प्रगतशील शेतकरी इत्यादी ठिकाणास भेट देणार आहेत.

माणगाव, तळा, रोहा व सुधागड या तालुक्यातील प्राधान्याने इच्छुक महिला शेतकऱ्यांनी आपली नोंदणी संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे १९ नोव्हेंबर २०२२पूर्वी करावी, असे आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी आनंद कांबळे यांनी केले आहे.

# मुरूडमध्ये पथविक्रेत्यांसाठी मार्गदर्शन शिबिर



**मुरूड : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना पथविक्रेत्यांच्या दृष्टीने लाभदायक असल्याने जास्तीत जास्त पथविक्रेत्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुरूड नगर परिषदेचे प्रशासक पंकज भुसे यांनी येथे केले.

प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी अंतर्गत मुरूड नगर परिषद कार्यालयात शहरातील पथविक्रेते, टपरीधारक, हातगाडीवाले, स्टॉलधारक यांच्यासाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी पंकज भुसे शिबिरार्थींना मार्गदर्शन करीत. सर्व बॅकांनी पथविक्रेत्यांचे प्राप्त अर्ज मंजूर करुन त्यांच्या खात्यामध्ये कर्जाची रक्कम जमा होईल हे पहावे, अशी सूचना त्यांनी या वेळी केली.

स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक चिन्मय जोशी, बॅक ऑफ महाराष्ट्राचे शाखा व्यवस्थापक दिपेश लोखंडे, बॅक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक अमोल गडाख, आयडीबीआयचे शाखा व्यवस्थापक सुनील बनसोडे, एचडीएफसीचे शुभम सावंत आदी या शिबिराला उपस्थित होते. त्यांनी पथविक्रेत्यांना मार्गदर्शन करुन त्यांच्या शंकांचे निरसन केले. या शिबिरामध्ये सर्वेक्षण करण्यात आलेल्या ९९ पैकी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेल्या ७९ पथविक्रेत्यांचे प्रस्ताव नगर परिषदे मार्फत बँकाकडे सादर करण्यात आले. बँकांच्या प्रतिनिधींनी या प्रस्तावांची तपासणी केली. नगर परिषदेचे प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, कर विभागाचे नंदकुमार आंबेतकर, प्रकाश आरेकर, लेखापाल कपिल वेहेले, लिपीक मनोज पुलेकर, कुमार आरकशी, निखिल दांडेकर, पथविक्रेते संघटनेचे अध्यक्ष अरविंद गायकर यांच्यासह पथविक्रिते या वेळी उपस्थित होते.

# भाजपतर्फे सारळ आदिवासीवाडीत बिरसा मुंडा यांची जयंती साजरी



**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष अलिबाग तालुका मंडळातर्फे मंगळवारी (दि. १५) तालुक्यातील सारळ आदिवासी वाडीमध्ये भगवान बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली.

भाजप युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस शैलेश नाईक यांच्या हस्ते उपस्थित आदिवासी बंधू भगिनींना टॉवेल वाटण्यात आले. क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून भाजप अलिबाग तालुका सरचिटणीस संतोष हरिभाऊ पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदिवासींच्या उत्कर्षासाठी राबविलेल्या विविध योजनांची माहिती संतोष पाटील यांनी आदिवासी बांधवांना दिली. या वेळी बिरसा मुंडा आणि भारत माता की जय यांच्या जयजयकाराने सारळ आदिवासी वाडी दुमदुमली.

मांडवा शक्तिकेंद्र प्रमुख सुनील माने, नारंगी बुथ अध्यक्ष नानची, तालुका उपाध्यक्ष मनोज रेडिज, तालुका चिटणीस तथा भाजपचे ज्येष्ठ नेते रवींद्र म्हात्रे यांच्यासह आदिवासी बांधव यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोह्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

## बाल दिनानिमित्त शिवआधार फाउंडेशनचा उपक्रम



**रोहे : प्रतिनिधी**

देशाचे पहिले प्रंतप्रधान प. जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन (१४ नोव्हेंबर) भारतात बाल दिन म्हणून साजरा करण्यात येतो. बालदिनाचे औचित्य साधून शिवआधार फाउंडेशनने सोमवारी रोहा तालुक्यातील उसर व तळवली येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिठाईचे वाटप केले.

सहाय्यक शिक्षक विठ्ठल पाटील यांनी प्रास्ताविक केले. शिवआधार फाउंडेशन तर्फे ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना मदत दिली जाते, असे फाउंडेशनचे सदस्य सुरेश मोरे यांनी सांगितले. फाउंडेशनचे अध्यक्ष नारायण खुळे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊ व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

फाउंडेशनचे सचिव निकेश पोकळे, संजय गायकवाड, संतोष सातपुते, जगदीश म्हसडे, राकेश नलावडे, मयूर पताडे, भारत मोहिते, चंद्रकांत राऊत यांच्यासह शाळा समिती सदस्य, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व शिक्षक या वेळी उपस्थित होते.

तळवली शाळेचे मुख्याध्यापक सचिन खेंगरे, उपशिक्षक संजय चव्हाण, विठ्ठल पाटील, चेतना मदनकार, श्रीहरी कोरे यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली. उसर शाळेचे मुख्याध्यापक सुधीर पाटील यांनी शिवआधार फाउंडेशनचे आभार मानले.

# निळगून ते आळंदी पायी दिंडी सोहळा



**माणगाव : प्रतिनिधी**

तात्यासाहेब बाळासाहेब वास्कर महाराज संप्रदाय प्रणित पायी दिंडीचे सोमवारी (दि. १४) हभप बाबू भिवा गुगळे महाराज यांच्या निळगून (ता. माणगाव) येथील निवासस्थानापासून देवाची आळंदीकडे प्रस्तान झाले.

तात्यासाहेब बाळासाहेब वास्कर महाराज संप्रदायातर्फे १४ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत निळगून ते देवाची आळंदी या पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ही पायी दिंडी सोमवारी सकाळी हभप बाबू भिवा गुगळे महाराज यांच्या निळगून येथील निवासस्थानापासून निघाली. या दिंडीच ताम्हिणी घाटातील कोंडेथर गावाजवळ सामाजिक कार्यकर्ते पंकज रवींद्र तांबे व त्यांचे सहकारी स्वप्नील शिर्के, संभाजी गायकवाड यांनी स्वागत केले. या दिंडीत सहभागी होऊन त्यांनी भाविकांना पाणी बॉटल व अल्पोपहाराचे वाटप केले.

हभप बाबू भिवा गुगळे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली देवाची आळंदीकडे निघालेल्या या दिंडीत कलमजे गावाचे पोलीस पाटील सुभाष वाढवळ, मोहन वाढवळ, राम गुगळे, काशिराम गुगळे, अनंता वाढवळ, राम वाढवळ, शशिकांत गुगळे, सुधाकर, वाढवळ, प्रकाश राऊत, दत्taराम पवार, मुकुंद वाढवळ, महेंद्र घाडगे, महादेव कोळी, तुकाराम गुगळे, बाबू गुगळे, सीताराम वाढवळ, श्रीपत जुमारे, बाळू धासाडे, सचिन भोनकर, भागोजी भोनकर, दिनेश मुंढे आदींसह भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

# फ्रीडम रायडर बाईकर रॅलीचे खोपोलीत जंगी स्वागत




**खालापूर : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून ७५ बाईकर्स काढलेल्या रॅलीचे बुधवारी (दि. १६) खोपोली शहरात भव्य स्वागत करण्यात आले.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून भारताचा सांस्कृतिक वारसा, शारिरीक स्वास्थ्य आणि बंधुभाव वृध्दींगत करण्यासाठी ७५ बाईकर्सने रॅली काढली आहे. या रॅलीतील बाईकर्स संपुर्ण भारतभर भ्रमंती करणार आहेत. पुण्याहून मुंबईकडे जाताना या रॅलीचे बुधवारी सकाळी खोपोलीतील जनता विद्यालयाच्या प्रांगणात पुष्पवृष्टी करून भव्य स्वागत करण्यात आले. रॅलीतील बाईकर्सनी विद्यार्थ्यांसमवेत आपले अनुभव शेअर करून फोटोसेशनदेखील केले. सर्व वयोगटातील बाईकर्समध्ये महिलांचाही समावेश होता.

रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, महाराष्ट्र राज्य क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे, खालापूर तालुका क्रीडा अधिकारी राजेंद्र हातनूर, खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाह किशोर पाटील, खोपोलीचे पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्यासह खेलो इंडिया अभियानातील खेळाडू आणि विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा ७५ दिवसांचा हा प्रवास असून, रॅलीतील ७५ बाईकर्स १५ ते ३४ राज्यातून २१ हजार किलोमीटर प्रवास करणार आहेत, असे फ्रीडम रायडर बाईकर रॅलीचे संस्थापक अध्यक्ष तथा समन्वयक हर्षल मोदी यांनी सांगितले. खोपोलीतील स्वागताने आपण भारावून गेल्याचेदेखील त्यांनी कबूल केले. ही रॅली अत्यंत शिस्तबद्धरीत्या मुंबईकडे प्रस्थान करत असताना सर्वांनी देशभक्तीपर घोषणा देत रॅलीला शुभेच्छा दिल्या.

# भारत-न्यूझीलंड मालिकेच्या ट्रॉफीचे अनावरण

## हार्दिक पांड्याची विल्यमसनसोबत क्रोकोडाइल बाईक सफर

**वेलिंग्टन : वृत्तसंस्था**

हार्दिक पांड्या आणि केन विलियम्सन यांनी भारत आणि न्यूझीलंड यांच्यात १८ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या मालिकेच्या चषकाचचे अनावरण केले. यासाठी दोन्ही संघांचे कर्णधार क्रोकोडाईल बाईकमध्ये बसून आले आणि स्टेअरिंग हार्दिकच्या हाती होते.





भारतीय क्रिकेट संघ न्यूझीलंडमध्ये पोहचला आहे. टीम इंडियाला यजमान संघाविरुद्ध आधी तीन सामन्यांची टी-२० आणि नंतर तेवढ्याचा वनडे सामन्यांची मालिका खेळायची आहे. मालिकेतील पहिला टी-२० सामना वेलिंग्टनमध्ये १८ नोव्हेंबर रोजी खेळवला जाईल. ही मालिका सुरू होण्यापूर्वी भारतीय संघाचा कर्णधार हार्दिक पांड्या आणि न्यूझीलंड संघाचा कर्णधार केन विल्यमसन वेलिंग्टनच्या रस्त्यावर क्रोकोडाइल बाइकचा आनंद लुटताना दिसले आहेत.

न्यूझीलंड क्रिकेटने त्यांच्या सोशल मीडियाच्या अधिकृत इन्स्टाग्राम पेजवर हार्दिक पांड्या आणि केन विल्यमसनचा हा व्हिडिओ अपलोड केला आहे. व्हिडिओमध्ये दोघांनीही डोळ्यावर काळा चष्मा लावला आहे. पांड्या आणि विल्यमसन त्यांच्या टीमची जर्सी घालून क्रोकोडाइल बाइक चालवताना दिसत आहेत.

**अशा होतील लढती**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील मालिकेतील पहिला टी-२० सामना येत्या शुक्रवारी (दि. १८) वेलिंग्टन येथील स्काय स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. दुसरा टी-२० सामना २० नोव्हेंबर रोजी माउंटमनुगेई येथे खेळवला जाईल. या मालिकेतील तिसरा आणि शेवटचा टी-२० सामना २२ नोव्हेंबर रोजी नेपियर येथे खेळवला जाणार आहे. त्यानंतर २५ नोव्हेंबरपासून ईडन पार्कवर एकदिवसीय मालिकेला सुरुवात होणार आहे. यातील दुसरा सामना २७ नोव्हेंबरला सिडॉन पार्कवर, तर तिसरा आणि शेवटचा एकदिवसीय सामना ३० नोव्हेंबरला हॅगले ओव्हलवर होणार आहे.



# कामोठ्याच्या लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांत सुयश प्राप्त केले आहे.

मुलांच्या १९ वर्षांखालील वयोगटात डॉजबॉलमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. १४ वर्षांखालील जुडो स्पर्धेत विद्यालयाच्या आदिती माने व तन्मय दळवी यांनी प्रथम, तर वेदांत झंजाड व रौनक सिंग यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला तसेच १७ वर्षांखालील गटात जान्हवी पवार हिने प्रथम क्रमांक व निधी टिकेने तृतीय क्रमांक मिळविला. याशिवाय पियुष मरगळेने प्रथम तसेच आश्लेष चिमणे, पार्थ पाटील व नयन चौगुले यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या, तर अभ्यास, व्यक्तिमत्त्व विकास याचबरोबर खेळालाही प्राधान्य देणाऱ्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांना विद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रतिज्ञा पाटील, रूपाली जोगदंड आणि हितेश कडू यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व विजयी विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

# रायगडच्या नैतिक, सिद्धार्थ यांची महाराष्ट्राच्या संभाव्य संघात निवड





**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे निवडण्यात १६ व २५ वर्षांखालील राज्याच्या संभाव्य संघात रायगड जिल्ह्यातील नैतिक सोळंकी आणि सिद्धार्थ या दोन खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. या संघाचे शिबिर पुणे येथे सुरू आहे.

नैतिक व सिद्धार्थ यांची अनुक्रमे १६ व २५ वर्षांखालील महाराष्ट्र संभाव्य संघ निवड निवड करण्यात आली आहे, अशी माहिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली. या दोन्ही खेळाडूंचे मते तसेच सर्व सदस्यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

रायगडचा १५ वर्षांखालील मुलींचा संघ प्रथमच महिलांच्या आमंत्रितांच्या स्पर्धेत सहभागी होणार आहे. २० नोव्हेंबरपासून ही स्पर्धा पुण्यात खेळली जाणार आहे. या संघाला रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे शुभेच्छा देण्यात आल्या.

# राष्ट्रीय योंगमुडो स्पर्धेत रायगडची टीम चॅम्पियन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कोरियन मार्शल आर्टचा एक प्रकार असलेल्या योंगमुडोची पहिली राष्ट्रीय चॅम्पियनशिप स्पर्धा पुणे वानवडी येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी चमकदार कामगिरी करीत चॅम्पियनशीप ट्रॉफी जिंकली.

या स्पर्धेमध्ये ३५०हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यात रायगड जिल्ह्यातील सीकेटी कॉलेज खांदा कॉलनी, एसएमडीएल कॉलेज कळंबोली आणि कारमल कान्वेंट स्कूल कळंबोलीमधील भूपेंद्र मार्शल ट्रेनिंग प्रोव्हाइडर संस्थेचे संस्थापक आणि प्रशिक्षक भूपेंद्र गायकवाड यांच्या ४६ खेळाडूंनी सहभाग घेतला.



रायगड जिल्ह्याच्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन करीत १७ सुवर्ण, १६ रौप्य आणि १३ कांस्यपदके जिंकून पहिल्या चॅम्पियनशिप ट्रॉफीवर आपले नाव कोरले. त्याचप्रमाणे प्रशिक्षक गायकवाड यांना बेस्ट टीचर अवॉर्ड म्हणून सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

**यशस्वी खेळाडू**

सुवर्णपदक विजेते : राज शितोळे, सोहम म्हात्रे, अपूर्व ढोबळे, यश मोरे, सोहम कोठावले, हर्षवर्धन पुजारी, सार्थक माने, सुरज गायकवाड, आयुष कांबळे, आदित्य खंडीझोड, अद्रिका खोडके, मृणाल गायकवाड, वृद्धी बिराजदार, हर्षाली म्हस्के, सिफा शेख, शिवानी नांगरे, धनेशा शिंगोटे; रौप्यपदक विजेते : ओम कोठावले, भावेश रोकडे, विशाल बुरंगे, अभीज्ञ गमरे, अर्णव निंबरे, हिमांशु राय, अथर्व नांगरे, प्रथमेश अहिरवाडगी, पार्थ सुतार, अथर्व धमाळ, सुजल कुंभार, सौम्या श्रीवास्तव, भारती चव्हाण, समृद्धी तांगडे, मानसी जाधव, प्रगती अहिरवाडगी; कांस्यपदक विजेते : श्रेयष जगदाळे, वेदांत कुडके, विश्वजीत बुरंगे, अलंकार सावलकर, यशराज चव्हाण, आदित्य जगदाळे, यश खुसपे, आर्यन सावंत, ओम कोकणे, रेहान शेख, गोवर्धन पुजारी, आयुषी माने, मयुरी पिसे.

# कामोठ्यात नगरसेवक चषक क्रिकेट स्पर्धा

## परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन





(छाया : अक्षय शार्दुल)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील पार्किंग बॉईज ग्रुपच्या वतीने नगरसेवक चषक २०२२ क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्व. दि. बा. पाटील क्रीडांगणात खेळल्या जात असलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. १६) झाले.

उद्घाटन समारंभास पनवेल महापलिकेच्या माजी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती कुसूम म्हात्रे, माजी नगरसेवक दिलीप पाटील, विजय चिपळेकर, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, रवींद्र म्हात्रे, अनिल चव्हाण यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते. या वेळी परेश ठाकूर यांनी मैदानात फटकेबाजी केली.

१८ नोव्हेंबरपर्यंत रंगणाऱ्या या स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्यास एक लाख, द्वितीय क्रमांकास ५० हजार, तर तृतीय क्रमांकास २५ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंनाही बक्षीस दिले जाणार आहे.

# एव्हरिथिंग इज फाईन -जडेजा

**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्सने (सीएसके) इंडियन प्रीमिअर लीगच्या पुढील पर्वासाठी अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा याला संघात कायम ठेवले आहे. कर्णधार महेंद्रसिंह धोनीने मध्यस्थी करून जडेजा व संघातील वाद मिटवला अन् भारताच्या स्टार खेळाडूला संघात राहण्यासाठी मनधरणी केली. त्यानंतर जडेजानेही धोनीसोबतचा फोटो पोस्ट करीत 'एव्हरिथिंग इज फाईन', असे तीन शब्दांचे ट्विट केले आहे.


आयपीएल २०२२नंतर जडेजा आणि सीएसके यांच्यातील संबंध ताणले गेले होते. त्यामुळे यंदाच्या आयपीएलमध्ये जडेजा दुसऱ्या संघाकडून खेळेल असा अंदाज बांधला जात होता.

# मँचेस्टर युनायटेडमधून मला काढून टाकण्याचे षडयंत्र

## रोनाल्डोचा व्यवस्थापकावर गंभीर आरोप

**मँचेस्टर सिटी : वृत्तसंस्था**

मँचेस्टर युनायटेड क्लबमधील स्टार फुटबॉलपटू क्रिस्टियानो रोनाल्डोने एका मुलाखतीच्या माध्यमातून क्लबच्या काही सदस्यांवर गंभीर आरोप केले आहेत. त्याला काढून टाकण्याचे षडयंत्र रचले जात आहे. असा आरोपही करण्यात आला असून त्यानंतर फुटबॉल विश्वात खळबळ उडाली आहे.



रोनाल्डोने दिलेल्या मुलाखतीत अनेक मोठे खुलासे केले आहेत. क्लबचे सध्याचे व्यवस्थापक एरिक टॅन हागसह अनेक उच्च व्यवस्थापन अधिकाऱ्यांवरही आरोप केले आहेत. रोनाल्डोने लावलेला सर्वांत मोठा आरोप म्हणजे व्यवस्थापक आणि दोन-तीन लोक त्याला क्लबमधून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. रोनाल्डो म्हणाला, मला फसविल्यासारखे वाटले. व्यवस्थापक आणि दोन-तीन वरिष्ठ कार्यकारी स्तरावरील लोक ज्यांना मी या वर्षीच नाही, तर गेल्या वर्षीही क्लबमध्ये नको होतो.

# नवी मुंबई जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेला प्रारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य अंतर्गत जिल्हा परिषद ठाणे यांच्या सहयोगाने नवी मुंबई महापालिकेच्या वतीने जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाचे उपायुक्त सोमनाथ पोटरे यांच्या हस्ते झाले.

महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नेरूळ येथील यशवंतराव चव्हाण क्रीडांगणात आयोजित क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास शिक्षण विभागाचे उपायुक्त योगेश कडुसकर, महापालिकेचे क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, ठाणे जिल्हास्तर क्रीडा स्पर्धा कार्यकारिणी समिती सदस्य पुरुषोत्तम पुजारी आदी उपस्थित होते.



खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असून नवी मुंबई महापालिकेस २००८-०९पासून क्रीडा क्षेत्रासाठी जिल्ह्याचा दर्जा मिळाल्यामुळे या नवी मुंबई जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील खेळाडूंना थेट विभागीय स्पर्धांमध्ये खेळण्याची संधी लाभत आहे. यामधून देशपातळीवर शहराचा नावलौकिक वाढविणारे खेळाडू घडतील, असा विश्वास सोमनाथ पोटरे यांनी व्यक्त केला.

योगेश कडुसकर यांनी, नवी मुंबई ही प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असून क्रीडा क्षेत्रातही अनेक गुणवंत नवी मुंबईत आहेत. या उदयोन्मुख खेळाडूंना आपले क्रीडागुण सिद्ध करण्यासाठी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा हे एक चांगले माध्यम असून याद्वारे अनेक गुणवंत खेळाडू नावारूपाला येतील, असे म्हटले.

नवी मुंबई जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ फादर ग्रेल वाशी आणि एमजीएम नेरूळ या दोन शाळांच्या संघांमधील १९ वर्षांखालील फुटबॉल सामन्याने करण्यात आला. या वेळी मान्यवरांच्या हस्ते मैदान पूजन व नाणेफेक झाली.

## २३४ शाळा आणि ३० हजार खेळाडू

या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील २३४ शाळा सहभागी झाल्या असून ३० हजारांहून अधिक खेळाडू ४८ क्रीडा प्रकारांमध्ये आपल्या क्रीडागुणांचे प्रदर्शन घडविणार आहेत. फुटबॉलव्यतिरिक्त टेबल टेनिस, क्रिकेट, जलतरण, खो-खो, कबड्डी, ॲथलेटिक्स, जिम्नॅस्टिक, बॅडमिंटन, रायफल शुटींग, व्हॉलीबॉल, शुटिंगबॉल, ज्युदो, किक् बॉक्सिंग आदी खेळांमध्ये खेळाडूंचा कस लागणार आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com